रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ३३७
www.ramprahar.com

सोमवार, २४ जून २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

म्हसळ्यात अल्पवयीन मुलीचा विनयभंग/२

कर्जतमध्ये नऊ इमारती, ९९ घरे धोकादायक/५

अफगाणिस्तानचा ऑस्ट्रेलियावर ऐतिहासिक विजय/८

## पुणे ड्रग्ज पार्ट्यांची चौकशी करणार -मंत्री देसाई



**पुणे** : येथील एफसी रोडवर असलेल्या हॉटेलमध्ये ड्रग्ज पार्ट्या होत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या हॉटेलच्या बाथरूममध्ये ड्रग्जचे सेवन केले जात होते. याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. यावर राज्य उत्पादन शुल्कमंत्री शंभूराज देसाई यांनी प्रतिक्रिया देत कारवाई करणार असल्याचे सांगितले. गेल्या महिन्याभरात आपण पुण्यात ४९ हॉटेल आणि बारवर कारवाई केली आहे तसेच सरप्राईज चेकिंगदेखील सुरू करण्यात आले आहे. नुकत्याच समोर आलेल्या ड्रग्ज पार्टी प्रकरणाची गंभीर दखल घेऊन चौकशी करणार आहे. तेथील क्षेत्रीय अधिकाऱ्याचीही चौकशी करणार आहोत, असे मंत्री देसाई यांनी म्हटले आहे. कुठल्याही अधिकाऱ्याबरोबर साटेलोटे नाही. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येईल. जो अधिकारी यात दोषी आढळेल, त्यावर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

### राजर्षी शाहू महाराज आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे

# माणगाव येथे संयुक्त स्मारक साकारणार

### मुख्यमंत्री शिंदेंची घोषणा



**मुंबई : प्रतिनिधी**

स्वराज्याबरोबर सुराज्य निर्माण करणे तसेच रयतेचे राज्य आणण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हे काम पुढे अविरत सुरू ठेवले. राज्य शासन हाच विचार पुढे घेऊन जात असून समता, बंधूता, न्याय या तत्वाद्वारे मागासवर्गीय घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करीत आहे. सर्वांच्या हाताला काम देण्यासाठी रोजगाराची उपलब्धता आणि पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी गतीने प्रयत्न केले जात असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी (दि. २३) मुंबई येथे केले. माणगाव (जि. रायगड) येथे राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संयुक्त स्मारक उभारण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. **(पान २ वर..)**



## उरण मोठी जुई येथील शेकापच्या परेश पाटील यांच्यासह ठाकरे गट, काँग्रेस कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

### आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांनी केले स्वागत

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील मोठी जुई येथील शेतकरी कामगार पक्ष, उद्धव ठाकरे गट आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आमदार महेश बालदी यांच्या कार्यप्रणालीवर आकर्षित होऊन रविवारी (दि. २३) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या वेळी शेकापच्या लाल ब्रिगेडचे प्रमुख कार्यकर्ते परेश पाटील यांच्यासह सर्व प्रवेशकर्त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी स्वागत केले.

मोठी जुई येथे झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमास भाजपचे उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, माजी जिल्हा परिषद विजय भोईर, जीवन गावंड, भाजप जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत, उरण तालुका सरचिटणीस सुनील पाटील, उपाध्यक्ष मुकुंद गावंड, प्रकाश ठाकूर, पूर्व विभाग अध्यक्ष शशिकांत पाटील, शहर अध्यक्ष कौशिक शाह, माजी नगरसेवक राजू ठाकूर, युवा पूर्व विभाग अध्यक्ष प्रवीण घासे, रोशन पाटील, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष राणी म्हात्रे, सरचिटणीस निर्मला घरत, चिटणीस संगीता गायकवाड, सदस्य विश्रांती म्हात्रे, जासई विभाग अध्यक्ष शमिता ठाकूर, जासई गाव अध्यक्ष मनिषा घरत, धनेश गावंड, देवेंद्र पाटील, मिलिंद पाटील, मोठी जुई ग्रामपंचायतीचे माजी सरपंच कुमार पाटील, धुतूमचे माजी सरपंच धनाजी ठाकूर, महिला कमिटी, युवा कमिटीसह कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी परेश पाटील, काशिनाथ पंडित, देविदास भगत, विद्याधर पाटील, श्रीयस पाटील, नवदीप पाटील, नितिकेश पंडित, जिचेन भगत, मधुकर भोईर, नरेश पाटील, जवान पाटील, हरेश भोईर, भरत भोईर, निलेश काशिनाथ भोईर, सतीश भोईर, दिनेश पंडित, निलेश शंभा भोईर, आनंद पाटील, गणेश गोवारी, सूरज कदम, अनिकेत पाटील, चंद्रकांत पाटील, चंद्रकांत गावंड, हर्ष भगत, प्रवीण भगत, रवींद्र कामोठकर, वासुदेव पंडित, सचिन भोईर, रोमेश पाटील, दुर्गेश पाटील, धनश्री पाटील, छाया पाटील, मनीषा पाटील, अस्मिता पाटील, लीला पाटील, अनिता पाटील यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या सर्व कार्यकर्त्यांचे पक्षाची शाल देऊन स्वागत करण्यात आले.

## आरक्षण खिरापत नाही -प्रा. हाके

**जालना : प्रतिनिधी**



ज्यांच्या नोंदीही केलेल्या नाहीत अशांना ओबीसी आरक्षण देण्यात आले आहे. कायदा बाजूला करून १६ टक्के आरक्षण देण्यात आले. त्यामुळे घटनेने दिलेले आरक्षण रद्द करा, अशी आक्रमक भूमिका मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी घेतली. ज्यानंतर ओबीसींच्या हक्कासाठी लढा देणारे प्रा. लक्ष्मण हाकेही आक्रमक झाले आहेत. जरांगेंचे दावे खोडून काढत आरक्षण ही काही खिरापत नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

हाके म्हणाले, मनोज जरांगेंना ओबीसी, मंडल आयोग, मंडल आयोग कधी लागू झाला? पहिल्यांदा किती जागा होत्या? याबाबत माहिती नाही. ते काहीही बोलत आहेत. घटनात्मक अधिकार असलेला राज्य मागासवर्गीय आयोग अभ्यास करून एखाद्या जातीचा समावेश करतो. मागासवर्गाला तो अधिकार आहे. मराठा समाजातील तरुणांना माझी विनंती आहे की, जर प्रगती करायची असेल, चांगले जीवन जगायचे असेल आरक्षण हा एकमेव पर्याय नाही.

### आरक्षण मर्यादा वाढविण्याची मराठा महासंघाची मागणी

**नागपूर** : अखिल भारतीय मराठा महासंघाला पुढच्या वर्षी १२५ वर्षे पूर्ण होत असताना रविवारी (दि. २३) मराठा महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची एक बैठक नागपुरात झाली. या बैठकीनंतर मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिलीप जगताप यांनी मराठा आरक्षणासाठी उपोषण करणाऱ्या मनोज जरांगे यांना आपला पाठिंबा असल्याचे सांगून आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा वाढवा ही पूर्वीपासूनची मागणी असल्याचे म्हटले.

## 'नीट' पेपरफुटी : लातूरमधून दोन शिक्षक ताब्यात, चौकशीनंतर सुटका

**लातूर : प्रतिनिधी**

वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या नीट यूजी सामाईक प्रवेश परीक्षेत गैरव्यवहार झाल्याचे समोर आल्यानंतर देशभरात खळबळ उडाली. बिहारमधून परीक्षेच्या प्रक्रियेत हस्तक्षेप करीत पेपरफुटी प्रकरण घडले असल्याचा आरोप आहे. या पेपरफुटी प्रकरणात महाराष्ट्रातून दोन शिक्षकांना ताब्यात घेण्यात आले आणि चौकशी करून सोडण्यात आले.

पेपरफुटी प्रकरणात बिहारमधून १३ लोकांना अटक करण्यात आल्यानंतर नांदेडच्या दहशतवादीविरोधी पथकाने (एटीएस) नीटच्या पेपरफुटी प्रकरणात लातूरमधून दोन शिक्षकांना अटक केली आहे. संजय तुकाराम जाधव आणि जलील उमरखाँ पठाण या दोन जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना नांदेड एटीएसकडून ताब्यात घेण्यात आले आहे. यापैकी एक शिक्षक लातूरमध्ये, तर दुसरा सोलापूरमध्ये कार्यरत आहे. लातूरमधून शनिवारी रात्री दोघांनाही ताब्यात घेतल्यानंतर चौकशी करून त्यांना सोडण्यात आले, मात्र पुन्हा चौकशी करण्याची गरज भासल्यास बोलावले जाईल, अशी ताकीद त्यांना देण्यात आली आहे.

## निवडक

### मायावतींनी पुन्हा भाच्याला केले उत्तराधिकारी घोषित

**लखनऊ** : उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री आणि बहुजन समाज पक्षाच्या सर्वेसर्वा मायावती यांनी पुन्हा एकदा आपला भाचा आकाश आनंद यांना आपला उत्तराधिकारी घोषित केले आहे. याशिवाय त्यांची पुन्हा एकदा पक्षाच्या राष्ट्रीय समन्वयकपदी निवड करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीदरम्यान आकाश आनंद यांनी वादग्रस्त विधान केल्याने त्यांना बसपच्या समन्वयक पदावरून हटवण्यात आले होते.

### अभिनेत्री सोनाक्षी, अभिनेता झहीर नोंदणी पद्धतीने विवाहबद्ध

**मुंबई** : अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा आणि अभिनेता झहीर इक्बाल लग्नबंधनात अडकले आहेत. नोंदणी पद्धतीने दोघांनी लग्न करून आयुष्याच्या नव्या प्रवासाला सुरुवात केली. दोन्ही कुटुंबियांच्या उपस्थितीत सोनाक्षी व झहीरचा लग्नसोहळा झाला. याचे फोटो समोर आले आहेत.

## अलिबागमध्ये तलावात बुडून दोन मुलांचा मृत्यू



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील मुनवली येथील तलावात रविवारी (दि. २३) दोन मुलांचा बुडून मृत्यू झाला. अथर्व शंकर हाके (वय १६, रा. मुणवली) आणि शुभम विजय बाला (वय १५, रा. तुडाळ) अशी या मुलांची नावे आहेत.

मुनवली पंचक्रोशीतील आठ मुलांचा ग्रुप वर्षासहलीसाठी मुनवली येथे आला होता. त्यातील अथर्व शंकर हाके व शुभम विजय बाला हे दोघे पोहत असताना पाण्याचा अंदाज न आल्याने बुडाले. या वेळी सोबत असलेल्या मुलांनी आरडाओरड केली. त्यामुळे परिसरातील लोक धावून आले, पण त्या मुलांना वाचवू शकले नाहीत. या मुलांच्या मृत्यूमुळे हळहळ व्यक्त होत आहे.

### पनवेलमध्ये नदीत बुडून एकाचा मृत्यू

**पनवेल** : येथील एका तरुणाचा तक्का नदीत पाय घसरून बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. प्रवीण पुष्पदत्त (वय १६, रा. पनवेल) हा तक्का गावाशेजारील नदीमध्ये पोहण्यास गेला असता त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## 'दिबां'च्या स्मृतिदिनानिमित्त मोफत आरोग्य शिबिर

### रिक्षा, टॅक्सी चालक मालक आणि परिवाराने घेतला लाभ






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष पनवेल शहर व तालुका आणि वंदे मातरम जनरल कामगार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त रिक्षा व टॅक्सी चालक मालक आणि त्यांच्या परिवारासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर रविवारी (दि. २३) आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. सुमारे चारशे जणांनी या शिबिराचा लाभ घेतला.

पनवेल मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या शिबिराच्या उद्घाटन समारंभास भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, वंदे मातरम कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत, उपाध्यक्ष रवी नाईक, माजी नगरसेवक नितीन पाटील, अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, वर्षा नाईक, वंदे मातरम संघटनेचे सरचिटणीस मोतीलाल कोळी, छाया तळेले, सुनिता रावले, रवींद्र कोरडे, पांडुरंग पाटील, दीपक खोत, महिला मोर्चा तालुका उपाध्यक्ष अरुणा पाटील, निलेश वांगिलकर, विश्वनाथ गडगे, दीपक नावडेकर, अंकुश पाटील, जगदीश पाटील, त्रिशूल दिघोडकर, गणेश पाटील, कल्पेश पाटील, उमेश पाटील, विनायक पाटील, दत्ता भोपी, सुबोध म्हस्कर, शर्मिला गडगे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते, तर महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही शिबिरास भेट दिली.

या शिबिरात नेत्र, हृदय, कॅन्सर, दंत, शुगर तपासणी, बोन मिनिरल डेन्सिटी, डॉक्टरांचा सल्ला यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.



# जुलैमध्ये पावसाचा वेग वाढणार

## भारतीय हवामान विभागाचा अंदाज



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतील शेतकऱ्यांसह सर्वांचं लक्ष मान्सूनच्या पावसाकडे लागलेले असते. गतवर्षीच्या तुलनेत यंदा मान्सून लवकर भारतात दाखल झाला, मात्र महाराष्ट्रातील काही भागात पोहचल्यानंतर मान्सूनचा वेग मंदावला होता. आता भारतीय हवामान विभागाने नव्यानं जारी केलेल्या अंदाजानुसार ३ जूलैपर्यंत मान्सून देशात पुन्हा आगेकूच सुरू करेल. उत्तर पश्चिम भारतात मान्सूनचा पाऊस जोरदार हजेरी लावण्याची शक्यता आहे. पंजाब, हरियाणा या राज्यांमध्ये मान्सूची प्रतीक्षा आहे. ११ जूननंतर भारतात मान्सूनचा वेगव मंदावला होता. दोन दिवसांपूर्वी मान्सून मध्य भारताच्या पुढे पोहचला होता.

पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव एम रविचंद्रन यांनी जुलैच्या पहिल्या आठवड्यात मान्सून पुन्हा गती प्राप्त करेल. त्यावेळी चांगला पाऊस होईल त्यामुळे जूनमध्ये कमी झालेल्या पावसाची जुलैमध्ये भरपाई होईल, असे त्यांनी म्हटले आहे.

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार मान्सून पुढील तीन ते चार दिवसात गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, ओडिशा, पश्चिम बंगालमधील काही भाग, बिहारचा काही भाग आणि उत्तर प्रदेशातून पुढे जाईल. या ठिकाणी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. २७ जून नंतर उत्तर, पश्चिम आणि मध्य भारतात पावसाचा जोर वाढेल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

हवामान विभागाचे शास्त्रज्ञ एम. राजीवन यांनी मान्सून पुन्हा सक्रीय होत असल्याचे म्हटले. जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत मान्सून पोहचेल. पुढच्या २-३ आठवड्यात चांगल्या पावसाची अपेक्षा आहे. ला नीनाच्या प्रभावामुळे ऑगस्ट महिन्यात चांगला पाऊस होईल, अशी अपेक्षा हवामान विभागाला आहे.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून मान्सून खोळंबला होता. जवळपास नऊ दिवस मान्सून नवसारी, जळगाव, मंडला, पेंड्रा रोड, झारसुगुडा, बालासोर, हल्दिया, पाकूर, साहिबगंज रक्सोलपर्यंत पोहचला होता. पुढील तीन ते चार दिवसात अरबी समुद्राचा उत्तरेकडील भाग, गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडिशा, पश्चिम बंगाल, झारखंड, बिहार आणि उत्तर प्रदेशच्या काही भागातून पुढे प्रवास करेल.

## अकोल्यात पूर; गावांचा संपर्क तुटला

**अकोला :** राज्याच्या विविध भागात मुसळधार पाऊस कोसळताना दिसत आहे. या पावसामुळे काही भागात जनजीवन विस्कळीत झाल्याचे पाहायला मिळत आहे. सध्या अकोल्यातही मुसळधार पाऊस सुरू आहे. अकोल्यातील अकोट तालुक्यात पठार नदीच्या पाण्यात अचानकपणे पहाटेपासून वाढ झाली आहे. त्यामुळे अकोल्यातील पनोरी आणि जणोरी गावाचा संपर्क तुटला आहे.

मुसळधार पावसामुळे पठार नदीला पूर आला आहे. यामुळे अकोल्यातील पनोरी आणि जणोरी गावाचा संपर्क तुटला आहे. अकोल्यातील अकोट तालुक्यातल्या पठार नदीच्या पाण्यात अचानकपणे पहाटेपासून वाढ झाली आहे. पणोरी आणि जणोरी गावाच्या रस्त्यावरील पठार नदीवर पुलाचे बांधकाम सुरू आहे, म्हणून गावकऱ्यांना पर्यायी वाहतूकीसाठी पर्यायी रस्त्या बांधला होता, पण सातपुडा पर्वतरांगात सुरू असलेल्या पावसामुळे पठार नदीला पूर आला आहे. हा पर्यायी रस्ता वाहून गेला आहे. सद्यस्थितीत दोन्ही गावांचा संपर्क तुटला असून गावकऱ्यांचा नदीतून जीवघेणा प्रवास सुरू आहे. दरम्यान, पुण्यातील पिंपरी येथे ढगफुटीसदृश्य पाऊस पडला. त्यामुळे पाणी साचले होते.

### अनेक भागात अतिवृष्टीचा इशारा

*राज्यातील काही जिल्ह्यांना हवामान खात्याने अतिवृष्टीचा इशाराही दिला आहे. यामध्ये कोकणातील जिल्ह्यांचा समावेश आहे. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी योग्य ती खबरदारी बाळगावी असं आवाहन प्रशासनाच्या वतीनं करण्यात आलं आहे. दरम्यान, मुंबई, ठाणे, भिवंडी, नवी मुंबईसह लगतच्या भागात पावसाची रिमझिम सुरू आहे. मुंबईच्या तुलनेत मुंबई महानगर प्रदेशात पावसाचा जोर अधिक आहे. मुंबई शहर आणि उपनगरात कुठे तरी एखादी सर पडत असली तरी ढगाळ हवामान कायम आहे. आज सिंधुदुर्ग जिल्ह्याला रेड अलर्ट देण्यात आला आहे. तर रत्नागिरी, सातारा, कोल्हापूरला ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर सोमवार, मंगळवार आणि बुधवारी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, कोल्हापूर, पुणे या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.*

### पेरणीच्या कामांना वेग

दरम्यान, ज्या भागात चांगला पाऊस झाला आहे, त्या भागात पेरणीच्या कामांना वेग आला आहे. ठिकठिकाणी शेतकरी पेरणी करताना दिसत आहे, मात्र काही ठिकाणी अद्यापही पेरणीसाठी चांगल्या पावसाची प्रतीक्षा कायम आहे. दरम्यान, चांगला पाऊस झाल्याशिवाय शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू, असा सल्ला कृषी विभागाच्या वतीने दिला आहे. साधारणत: १०० मिलीमिटर पावसाची नोंद झाल्याशिवाय शेतकऱ्यांनी पेरणी करू नये, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# मान्सूनसाठी कोकण रेल्वे सज्ज

## आव्हानांना तोंड देण्याकरिता उपाययोजनांची तयारी

**नवी मुंबई : बातमीदार**

कोकण रेल्वे मान्सूनमधील आव्हानांसाठी सज्ज झाली आहे. पायाभूत सुविधांची देखभाल, वाढीव गस्त आणि आपत्कालीन तयारी यावर लक्ष केंद्रित करून मान्सूनच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी सर्वसमावेशक उपाययोजनांची तयारी कोकण रेल्वेने केली आहे.

बेलापूर (कोकण रेल्वेचे मुख्य कार्यालय) येथे गुरुवारी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी कोकण रेल्वेचे चेअरमन संतोष कुमार झा यांनी याबाबतची माहिती दिली. या वेळी कोकण रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी गिरीश करंदीकर उपस्थित होते.

झा म्हणाले मान्सूनचा हंगाम सुरू झाला आहे. कोकणात मुसळधार पाऊस पडतो. या वेळी कोकण रेल्वेच्या मार्गात अनेकदा दरड कोसळण्याचे प्रकार घडतात. याशिवाय विविध नैसर्गिक आपत्ती कोकणात येत असल्याने त्याचा परिणाम रेल्वे मार्गावर होत असतो, मात्र कोणतीही आपत्ती आली तरी कोकण रेल्वेवर परिणाम होऊ नये. सेवा सुरळीत सुरू रहावी यासाठी विविध खबरदारीच्या उपायोजना केल्याचे झा यांनी सांगितले.

पावसाळ्यात रेल्वे मार्गावर गस्त घालण्यासाठी ६७२ जवानांची तैनाती. करण्यात आली आहे. रेल्वे देखभाल वाहन वीर, चिपळूण, रत्नागिरी, राजापूर रोड, कुडाळ, वेर्णा, कारवार, भटकळ आणि उडुपी या ०९ नियुक्त ठिकाणी तैनात करण्यात आले आहे.माणगाव, चिपळूण, रत्नागिरी, कणकवली, करमाळी, कारवार आणि उडुपी येथे त्वरित आपत्कालीन प्रतिसादासाठी टॉवर वॅगन्स तैनात आहेत.

नियंत्रण कार्यालय/स्थानकाशी आपत्कालीन संप्रेषणासाठी मोबाइल फोनसह सुसज्ञ सुरक्षा कर्मचारी तैनात आहेत. लोको पायलट आणि रक्षकांना वॉकी-टॉकी सेट प्रदान केले गेले आहेत. सर्व स्टेशन्स २५ वॅट VHF बेस स्टेशन्सने सुसज्ञ आहेत जे ट्रेन क्रू आणि स्टेशन मास्टर्स यांच्यात अखंड वायरलेस कम्युनिकेशनसाठी उपयुक्त ठरणार आहेत. आणि शरावती पूल (होन्नावर आणि मानकीदरम्यान) या चार ठिकाणी निमोमीटर बसवले आहेत.

### असे आहे वेळापत्रक

***मान्सूनचे वेळापत्रक १० जून ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत सक्रिय राहण्याची शक्यता आहे. सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आणि आव्हानात्मक हवामान परिस्थिती सामावून घेण्यासाठी विभागीय वेग कमी केला जाणार आहे. हवामान अंदाजाचे दैनंदिन अपडेट्स भारत हवामानशास्त्र विभागकडून घेतले जातात. प्रवासी www.konkanrailway.com वर किंवा १३९ डायल करून ट्रेनची स्थिती ऑनलाइन तपासू शकणार आहेत.***

# म्हसळ्यात अल्पवयीन मुलीचा विनयभंग

## एकाच कुटुंबातील तीन आरोपी; एक जण ताब्यात

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्यांतील मेंदडी येथील घरकाम करणाऱ्या अल्पवयीन मुलीने दिलेल्या फिर्यादी वरून म्हसळा पोलिसांनी तीन आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. एका आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.



गुन्हा नोंदविताच उपविभागीय पोलीस अधिकारी विवेक मुगळीकर यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासी अंमलदार डी. व्ही.एडवळे यांना मार्गदर्शन केले. मुलीने २३ मार्चपासून घरकाम करीत असलेल्या ठिकाणी घडत असलेला प्रकार आई- वडीलांना सांगितला असता आई आणि मुलीने मंगळवारी (दि. १८) पोलिसांत तक्रार दिली, असे एडवळे यांनी सांगितले. तर तपासी अंमलदार डी.व्ही. एडवळे यांनी एक आरोपी अटक असूनही अन्य दोनही आरोपींचे वय सांगण्यात असमर्थता व्यक्त केली.

दुसरीकडे म्हसळा पोलीस ठाण्यामध्ये गुन्ह्याचे साध्यर्म असलेला गु.रजि नं.४८/२०२४ प्रमाणे ११ मे रोजी नोंद असून त्यातही फिर्यादी अल्पवयीन मुलगी तीच आहे. येथेही आरोपी एकाच म्हणजे समाजाचे आहेत. ते चार जण अटकेत आहेत. दोन्ही गुन्ह्यांत मार्गदर्शकांसह तपासी अंमलदारसुध्दा पीएसआय डी. व्ही.एडवळे आहेत.

# नेरूळ येथे शॉर्टसर्किटमुळे घराला लागली आग

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ सेक्टर २, घरकुल अपार्टमेंट येथील घरात रविवारी (दि. २३) शॉर्टसर्किट झाल्यामुळे भीषण आग लागली. याबाबतची माहिती रहिवाशांनी भाजपच्या सुहासिनी नायडू यांना सांगितली. नायडू व त्यांच्या सहकाऱ्यांनी तडीने धाव घेत घरी जाऊन लोकांच्या मदतीने वीज लाईन व गॅस लाईन सर्व काळजीपूर्वक बंद केले.

घरातील महिला व मुलीला बाहेर काढले. गृहिणीला किरकोळ भाजले असून, सुदैवाने मोठी हानी झाली नाही. या वेळी तातडीने अग्निशमन दलाला बोलवण्यात आले. अग्निशमन दलाने येऊन तातडीने आग विझविली या आगीत घरातील वस्तू जळाल्याने नुकसान झाले आहे.



पान १ वरून

## माणगाव येथे संयुक्त स्मारक साकारणार

विवेक विचार मंचतर्फे चौथ्या राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषद २०२४चे मुंबईतील नरिमन पॉईंट येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा, कौशल्य विकास राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे अध्यक्ष किशोर मकवना, 'बार्टी'चे महासंचालक डॉ. सुनील वारे, विवेक विचार मंचचे अध्यक्ष प्रदीप रावत, कार्यवाहक महेश पोहनेरकर, सामाजिक कार्यकर्ते अश्विनी चव्हाण, किशोर कांबळे यांच्यासह राज्यातील १६० संघटनांचे प्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते परिषदेस उपस्थित होते.

जगातील सर्वोच्च राज्यघटना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून आपल्या सर्वांना दिली. त्याच राज्यघटनेस अनुसरून आपण काम करीत आहोत, असे सांगून संविधान हे सर्वोच्च असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी आवर्जून नमूद केले.

राज्यातील कोणताही युवक बेरोजगार राहणार नाही यासाठी मुख्यमंत्री स्वयंरोजगार योजना, कौशल्य विकास योजना तसेच स्टार्टअप सारख्यायोजना राज्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. राज्य शासनाच्या माध्यमातून नुकताच जर्मनीमध्ये चार लाख रोजगार उपलब्ध होण्यासाठीचा शासन स्तरावर करार करण्यात आल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश विकासाच्या दिशेने जात आहे. राज्यातही अनेक मोठे विकासाचे प्रकल्प हाती घेतले आणि प्राधान्य क्रमाने त्याची अंमलबजावणीही केली. यामध्ये कौशल्य विकास विभागामार्फत युवकांना रोजगार उपलब्ध करून देणे, महिला बचत गटांना आर्थिक प्रोत्साहन देण्याचे काम तसेच राज्यातील रस्त्यांच्या रुंदीकरणाचे काम आणि मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. याशिवाय जुलै महिन्यात येणाऱ्या देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त वारीमध्ये सहभागी वारकरी बांधवांना सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन स्तरावर काटेकोरपणे नियोजन करण्यात आले आहे तसेच वारकऱ्यांना पाच लाखापर्यंत विमा संरक्षण देण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

राज्य शासनाच्या योजना, उपक्रम, ध्येय-धोरणे तळागाळापर्यंत पोहचवण्याचे काम सरकारी कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून होत असते. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी राज्य शासन कटीबद्ध आहे. जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

कौशल्य विकास विभागांतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अनुसूचित जातीच्या १५० विद्यार्थ्यांना स्टार्टअप सुरू करण्यासाठी एक ते पाच लाख रुपयांपर्यंतची आर्थिक मदत उपलब्ध करून देणार असल्याचे कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी या वेळी सांगितले. या विभागांतर्गत असणाऱ्या ४३८ औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच ७० तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थामध्ये संविधान मंदिराची निर्मिती करण्यात येणार आहे तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या व्यवस्थापन समितीमध्ये एक मागासवर्गीय सदस्याची नियुक्ती करणे बंधनकारक करणार असल्याचेही मंत्री लोढा यांनी सांगितले.

या वेळी राजर्षी छत्रपती शाहू महाराज सामजिक न्याय पुरस्कार २०२४चे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. नितीन मोरे (मुंबई), ज्योती साठे, सत्यवान महाडिक (महाड), घनश्याम वाघमारे (पुणे), संतोष पवार (छत्रपती संभाजीनगर) महावीर धक्का (जालना), मनीष मेश्राम (नागपूर), फकिरा खडसे (वर्धा) तसेच देव देश प्रतिष्ठान मुंबई, भीम प्रतिष्ठान सोलापूर यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र वितरण करून सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी संविधानाच्या सारनाम्याचे सामूहिक वाचन करण्यात आले.





**पनवेल : शहरातील कल्पतरू सोसायटीकडे जाणाऱ्या रस्त्यावर पावसामुळे झाड पडल्याने वाहनचालकांना गैरसोय होत होती. ही घटना समजताच माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी पालिकेच्या कर्मचाऱ्यांना सांगून रस्त्यात पडलेले झाड बाजूला करून घेतले.**

# बेलापूरमध्ये नऊ फुटी अजगरास जीवदान

**नवी मुंबई : बातमीदार**

सीबीडी-बेलापूर सेक्टर ११ येथील रायगड भवन मैदान परिसरामध्ये लाकडी फळ्यांमध्ये वेटोळे मारून बसलेल्या नऊ फूट लांबीच्या अजगराला पुनर्वसू फाउंडेशन संस्थेच्या सर्पमित्रांनी जीवदान दिले.

रायगड भवन मैदान परिसरामध्ये एक मोठा साप असल्याची माहिती शुक्रवारी दुपारी तेथील नागरिकांनी पुनर्वसू फाउंडेशनला दिली. सर्पमित्र स्वप्नील साटम आणि सर्पमित्र अनिकेत गायकवाड हे तत्काळ घटनास्थळी धाव घेतली असता सुमारे नऊ फूट लांबीचा अजगर लाकडाच्या फळ्यांच्या ढिगाऱ्यात वेटोळे मारून बसल्याचे आढळले. उपस्थित असलेल्या काही लोकांनी अजगराला मारण्यासाठी काठ्या, दगड जमा केले होते. सर्पमित्र स्वप्नील व अनिकेत यांनी या नागरिकांना समजावून सांगून बचावकार्य सुरू केले.यावेळी सिडकोचे सुरक्षा सहायक अधिकारी अमृत म्हात्रे व रायगड भवन सुरक्षारक्षकांनी नागरिक व कर्मचाऱ्यांचा गर्दीस आवर घालण्यासाठी मदत केली. बचाव कार्य सुरू करताना लाकडांचा ढिगारा बाजूला करून सुमारे एक तासाच्या प्रयत्नानंतर सर्पमित्रांनी अजगरास सुखरूपरीत्या पकडले.

अजगरास कोणतीही इजा झाली नसल्याची खात्री करून त्याला नंतर सुरक्षितपणे जंगलात सोडण्यात आले. या वेळी उपस्थितांनी सर्पमित्रांच्या कामाचे कौतुक केले. या बचाव कार्यात सिडकोचे सुरक्षा सहायक अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून सहकार्य मिळाल्याने अजगराचा जीव वाचविण्यास यश मिळाल्याचे सर्पमित्र स्वप्नील साटमने सांगितले. या वेळी सर्पमित्रांनी उपस्थित नागरीकांना सापाबद्दल माहिती दिली. तसेच साप अपल्या निसर्ग चाक्रासाठी किती महत्त्वाचे असतात हे समजावून सांगितले.

# कोप्रोली ते कार्ला बाईक रॅली

**उरण : बातमीदार**

सामाजिक कार्यकर्ते देविचंद अनंत म्हात्रे यांच्या संकल्पनेतुन एकविराप्रेमी ग्रुप कोप्रोली उरणतर्फे दरवर्षी उरण ते कार्ला (एकविरा देवी मंदिर) असे बाईक रॅली काढली जाते. पर्यावरणाचा संरक्षणाचा संदेश देत कार्ला डोंगर परिसरात वृक्षारोपण केले जाते.

उरण तालुक्यातील श्री एकविरा प्रेमी ग्रुप कोप्रोली उरण तर्फे यंदाही उरण ते श्री एकविरा मंदिर (कार्ला) अशी बाईक रॅली काढण्यात येणार आहे. कार्लाल्या पोहचल्यावर एकविरा आईचे दर्शन घेतल्यानंतर सर्वांनी एकत्र येत एकविरा देवी मंदिर परीसरात वृक्षारोपण करणार आहेत. दरवर्षी अशा उपक्रमातून झाडे लावा झाडे जगवा असा संदेश या उपक्रमाक्रतून देण्यात येतो. ७ जुलै रोजी ही रॅली निघणार आहे.


या वेळी मी एकविरा प्रेमी ग्रुप कोप्रोली उरणचे एकूण ३००हून जास्त पदाधिकारी सदस्य रॅलीत मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. ज्या भाविक भक्तांना, युवकांना या रॅलीत सहभागी व्हायचे आहे त्यांनी देविचंद म्हात्रे (९८२१८३८४०८), विकी कोळी (९८२०६७३४१५), विराज पाटील (९९३०२०७८७६), विधाता पाटील (९९२०८६२०२९), जितू पाटील (९७७३१०१५१३), प्रसाद खोपटे (८८५५९६३७७६), राहुल पाणदिवे (८४२४९०९६४५), चेतन पिरकोन (९८१९७५९१०५) या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# 'दिशा'कडून आदिवासी विद्यार्थ्यांना वस्तूंचे वाटप

**पनवेल :** दिशा व्यासपीठाच्या वतीने आदिवासी पाड्यांवर शालेय विद्यार्थ्यांना विविध वस्तूंचे वाटप करण्यात आले.

कर्जतजवळ पिंपळपाडा हा आदिवासी भाग आहे या पाड्यातील शाळेत इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंत २३ मुले -मुली शिक्षण घेतात. या विद्यार्थ्यांप्रती सामाजिक बांधिलकी जपून कर्तव्य म्हणून दिशा व्यासपीठाच्या या नियोजनासोबत नेहमीच समाजभान जपणाऱ्या धीरज स्नेह उपहारच्या इंदू झा व अमित पाटील यांच्या विशेष सहकार्याने प्रत्येकी मुलांना शाळेची बॅग व छत्रीचे वाटप करण्यात आले तसेच मुलांना खाऊही देण्यात आला.

मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध स्पर्धाचे आयोजन करून त्यासाठी लागणारी बक्षिसे व शैक्षणिक साहित्य दिशा व्यासपीठाकडून पुरवले जाईल अशी ग्वाही दिशा व्यासपीठाच्या उपाध्यक्ष विद्या मोहिते यांनी दिली. या वेळी दिशा व्यासपीठाच्या संस्थापक निलम आंधळे यांनी मुलांशी संवाद साधल्यानंतर प्रतिकूल परिस्थिवर मात करीत उचित ध्येय व जिद्दीच्या जोरावर ही मुले उद्याचे उज्ज्वल भविष्य नक्की घडवतील, अशी आशा व्यक्त केली. या वेळी शाळेचे शिक्षक आशिष, गावडे व दिशा व्यासपीठाच्या रेखा ठाकूर व तनया आंधळे या वेळी उपस्थित होते.



## निवडक

### दुचाकीची चोरी; गुन्हा दाखल

**पनवेल :** खांदेश्वर रेल्वेस्थानकाजवळील सार्वजनिक शौचालयाजवळ असलेल्या मोकळ्या जागेत उभी करून ठेवलेल्या मोटरसायकलची अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची घटना घडली आहे. विक्रम गुलगे यांनी त्यांची दुचाकी ठिकाणी उभी करून ते कामानिमित्त बाहेर गेले असताना अज्ञात चोरट्यांनी ती दुचाकी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### वर्षा फिटनेस ग्रुपतर्फे योग दिन साजरा



**उरण :** शहरातील वर्षा फिटनेस ग्रुपच्या वतीने दर वर्षाप्रमाणे यंदाही शुक्रवारी (दि. २१) आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. वर्षा फिटनेस ग्रुपच्या वर्षा पेवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रम घेण्यात आला. सुमारे ४० महिलांनी सहभाग घेतला होता. या वेळी वर्षा पेवेकर, अनिता सावंत, दिपाली मुकादम, दीक्षिता माळी, सोनाली माळी, दिव्या पाटील, मोनिका कोळी, प्रीती आंबेकर, अशा पाटील, पूनम वाजेकर, सीमा कोळी, कविता पाटील, शैस्ता कादरी आदी महिलांनी सहभाग घेतला होता. वर्षा फिटनेस ग्रुपच्या वर्षा पेवेकर यांनी योगाचे महत्त्व, त्याचे फायदे, आरोग्य विषयी माहीती दिली.

# पनवेलमध्ये मालमत्ता कराचा 'विशेष' भरणा

## खारघरमधील शिबिराला नागरिकांचा मोठा प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर महापालिकेकडून सुधारित देयकांचे वाटप करण्यात आलेले आहे. पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार नागरिकांना बिले भरणे सोयीचे व्हावे यासाठी नागरिकांच्या सोयीसाठी खारघर ३६ सोसायटीमध्ये २२ जूनपासून विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांचा लाभ घेऊन तत्काळ कर भरणा करावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

या आवाहनाला मालमत्ता धारकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. मालमत्ता कर भरण्यासाठी ३० जूनपर्यंत शनिवार रविवारी (दि. २३)देखील महापालिकेचे मुख्यालय व प्रभाग कार्यालय सुरू असणार आहेत. पनवेल महापालिकेमार्फत आकारण्यात आलेल्या पूर्वलक्षी मालमत्ता कराबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या स्पेशल लीव्ह



पिटीशन क्रमांक १०८४९/२०२३ मधील सिव्हिल अपील क्रमांक ६०६५/२०२४ संदर्भात अंतरिम निकाल २९ एप्रिल २०२४ रोजी लागला आहे. अंतरिम निकालानुसार करनिर्धारण वर्ष २०२१-२२ पासून मालमत्ता कराच्या सर्व थकीत रकमेचा भरणा दोन महिन्यांच्या आत करण्याचे निर्देश मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आहेत. या आवाहनाला नागरिकांचा भरभरून प्रतिसाद मिळत असून गेल्या मंगळवारपासून रोज सुमारे ४ कोटींचा भरणा पालिकेच्या तिजोरीत होत आहे.

ज्या मालमत्ताधारकांना अद्यापही सुधारित मालमत्ता कर देयक प्राप्त झालेले नाही त्यांनी ऑनलाईन पोर्टल (संकेतस्थळ) किंवा महानगरपालिका कार्यालयास भेट देऊन सुधारित देयक उपलब्ध करून घ्यावे. महापालिकने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी PMC TAX APP हे मोबाईल अ‍ॅप विकसित केले आहे. तसेच www.panvelmc.org या वेबसाईटवरती जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. याचा लाभ मालमत्ताधारकांनी घ्यावा. मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास १८००-५३२०-३४० या टोल फ्री क्रमांवरती संपर्क साधावा असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे सुधारीत देयके पुन्हा तयार करावी लागल्याने सन २०२४-२५ च्या चालू कर मागणीवर दिनांक ३१ मे अखेर देण्यात आलेली पाच टक्के इतकी सूट दिनांक ३० जून २०२४ पर्यंत वाढविण्यात आलेली असून नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे. याशिवाय मालमत्ता कराचा भरणा ऑनलाईन केल्यास एकूण दोन टक्के इतकी सुट दिली जात असल्याने नागरिकांनी त्वरित कर भरणा करून महापालिकेस सहकारी करावे तसेच पनवेल शहराच्या सर्वांगीण विकासास हातभार लावावा.

**खारघरच्या सोसायट्यांमध्ये तारखेप्रमाणे शिबिराचे आयोजन**

* निसर्ग ग्रुप हाईड पार्क, जलवायू डिफेन्स, खारघर सेलिब्रेशन के एच४, रघुनाथ विहार आर्मी, स्पागेट्टी, केसर गार्डन सोसायट्यांमध्ये - २२,२३, २४ जून
* रेजन्सी गार्डन, केसर हार्मोनी, हावरे स्प्लेंडर, पारिजात , भुमीराज वुड्स, कुंजविहार या सोसायट्यांमध्ये - २९,३० जून
* महालक्ष्मी, मातृछाया, वास्तुविहार, प्रियदर्शनी, हेक्स ब्लॉक्स जलवायु विहार डिफेन्स या सोसायट्यांमध्ये -२५ जून
* साईमन्नत, महावीर, साई साक्षात, रेल विहार, पटेल हेरीटेज, गुडविल पॅराडाईज सोसायट्यांमध्ये -२६ जून
* केंद्रीय विहार, चतुर्भुज, उत्सव, शहा आर्केड, हावरे टीआर, प्राईम रोझ, रासवूड हाईट्स सोसायट्यांमध्ये - २७ जून
* शाह किंग्डम, केसर एक्झोटिका, मकरंद विहार, ओम हार्मोनी, कामधेनू या सोसायट्यामध्ये - २८ जून

**४.२७ कोटींची वसुली**


२९ एप्रिल ते २२ जूनपर्यंत ९२.६२ कोटी वसूली झाली आहे. तसेच २२ जून रोजी एकूण ४.२७ कोटींची वसुली झाली आहे. विशेष शिबिरांच्या माध्यमातून खारघर विभागाचा २.६७ कोटी या प्रमाणे वसूली झाली आहे.





**पनवेल : आषाढी एकादशीसाठी पनवेल ते पंढरपूर अशी संत तुकाराम महाराज पायी कोकण दिंडी पनवेलवरून पंढरपूरकडे निघाली. आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिंडीला भेट देत वारकऱ्यांचा आशीर्वाद घेतला व त्यांना आषाढी वारीच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, भूपेंद्र पाटील, पद्माकरमहाराज पाटील, सीताराम जळे, विश्वनाथ शेळके, शंकर फडके, धाऊ पाटील, प्रभाकर नावडेकर आदी उपस्थित होते.**

## 'दिबां'च्या स्मृतिदिनानिमित्त आज विविध समाजोपयोगी उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दिवंगत दि.बा. पाटील यांच्या अकराव्या स्मृतिदिनानिमित्त सोमवारी (दि. २४) लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीमार्फत विविध उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

सोमवारी सकाळी ९.३० वाजता पनवेल येथील संग्राम निवासस्थानी लोकनेते दि.बा. पाटील यांना अभिवादन करून आदरांजली वाहण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी १० वाजता आगरी समाज मंडळाच्या पनवेल येथील सभागृहात अखिल आगरी परिषद आणि आगरी समाज मंडळ यांच्या वतीने आदरांजली कार्यक्रम, घणसोली गाव येथील लोकनेते दि.बा. पाटील सभागृहात सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत महाआरोग्य शिबिर, भव्य कॅरम व बुद्धीबळ स्पर्धा, ठाणे जिल्ह्यातील कळवा खारीगाव येथे सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत व्याख्यनामाला, कल्याण डोंबिवलीतील माणकोली येथील मानकोळेश्वर मंदिर येथे सकाळी १०.३० वाजता महाआरोग्य शिबिर, जासई येथील जिजामाता रुग्णालयात सकाळी १०.३० वाजता आरोग्य शिबिर तसेच उरणमध्ये महिला सक्षमीकरण कार्यक्रम व आरोग्य शिबिर असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

## पाळणाघरात मुलीचा विनयभंग; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

पाळणाघरात ठेवलेल्या सात वर्षीय मुलीचा विनयभंग केल्याचा धक्कादायक प्रकार खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आला आहे. याप्रकरणी आरोपी गोरखनाथ देशमुख (वय ३७) यांच्याविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

पीडित सात वर्षीय मुलीचे आई-वडील नोकरीनिमित्ताने बाहेर जातात. त्यांनी त्यांच्या सात वर्षीय मुलीला पाळणाघरात ठेवले होते. १० मे ते २६ मेच्या दरम्यान सायंकाळी आठच्या सुमारास आरोपी गोरखनाथ देशमुख यांनी या मुलीला किचनमध्ये घेऊन जाऊन विनयभंग गेला. त्यानंतर काही दिवसांनी पुन्हा पीडित मुलीचे आई-वडील तिला पाळणा घरात ठेवण्यासाठी गेले असता या मुलीने त्या ठिकाणी जाण्यास नकार दिला.

या वेळी कौन्सिलरकडे मुलीला नेल्यानंतर तिने घडलेला प्रकार त्यांना सांगितला. त्यानंतर पीडित मुलीच्या आईने गोरखनाथ देशमुख विरोधात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला. पोलिसांनी आरोपीला अटक केली असल्याची माहिती दिली आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

## शिवकरजवळ टेम्पो आणि कंटेनरचा अपघात; एकाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील मुंबई-पुणे महामार्गावर मुंबई लेनवर किमी ५.६०० येथे शिवकर गावच्या हद्दीत पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत टेम्पो आणि कंटेनरचा मध्यरात्रीच्या सुमारास अपघात झाला. यात कंटेनरचालकाचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



यातील आयशर टेम्पो (एमएच ४७ वाय ४६४६) यावरील चालक बबलू नंदलाल यादव (वय ४५ वर्षे रा. चारकोप हिंदुस्तान नाका कांदिवली मुंबई) हे त्यांच्या ताब्यातील आयशर टेम्पो मुंबई पुणे दुर्तगती महामार्गावर किमी ५.६०० येथे शोल्डर लेनला थांबवून लघुशंकेला गेले. त्यांच्या पाठीमागून येणाऱ्या कंटेनर (एमएच ४३ बीएक्स ७९७६) यावरील चालक प्रियदर्शनी नायर (वय ६० वर्षे), यांचे गाडीवरचे नियंत्रण सुटून पुढे शोल्डर लेनला उभा असलेल्या आयशर टेम्पोला पाठीमागून धडक देऊन अपघात झाला आहे. अपघातात कंटेनर ड्रायव्हर समोरची काच फुटून ड्रायव्हर काचेतून उडून कंटेनरच्या समोर रोडवर पडल्याने त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. जखमी व्यक्तीस आयआरबी अ‍ॅम्ब्युलन्समधील डॉक्टर यांनी तपासून मयत घोषित केले. मयत व्यक्तीला खासगी अ‍ॅम्ब्युलन्सने पनवेल ग्रामीण रुग्णालयात पुढील कारवाईसाठी नेण्यात आले आहे. अपघात ठिकाणी वाहतूक पोलीस स्टाफसह व आयआरबी कडील स्टाफ, देवदूत टीम, तसेच पनवेल शहर पोलीस स्टेशनचे पोलीस हजर होते. अपघातातील दोन्ही वाहने शोल्डर लेनला उभी असून त्यांना बॅरिकेटिंग करण्यात आलेले आहे. महामार्गावरील वाहतूक सुरळीत चालू करण्यात आली आहे.



**पनवेल : आषाढी एकादशी सोहळ्यासाठी शिवकर ते पंढरपूर पायी दिंडी निघाली असून भाजपचे पळस्पे जि प. विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे यांनी वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्या.**



**पनवेल : न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी न्हावे ग्रामपंचायत माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, माजी उपसरपंच तथा विद्यमान सदस्य सागर ठाकूर, न्हावा गाव अध्यक्ष गजानन म्हात्रे, भाजप गाव अध्यक्ष तुषार भोईर, न्हावाखाडी गाव अध्यक्ष सी.एल. ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य नरेश मोकल, किशोर घरत, जयेश घरत, विनोद पाटील, जॉर्ज मिनिजेस, प्रमोद कोळी आदी उपस्थित होते.**

## 'पीईएस'तर्फे दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल एजुकेशन सोसायटी (पीईएस) संचालित याकुब बेग हायस्कूल व जुनियर कॉलेज पनवेल, पीईएस इंग्लिश स्कूल व जुनियर कॉलेज पनवेल, नॅशनल उर्दू हायस्कूल व जुनियर कॉलेज पनवेल तसेच अंगलो उर्दू हायस्कूल बारापाडा या शाळातील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभ व नेशनल उर्दू हायस्कूल तळोजाचे मुख्याध्यापक हनीफ मुल्ला व याकुब बेग प्राथमिक शाळेच्या सहाय्यक शिक्षिका हमीद खान यांचा निरोप समारंभ संस्था संचालित याकुब बेग हायस्कूल व जुनियर कॉलेज, पनवेल येथे झाला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते. पनवेल एजुकेशन सोसायटीचे अध्यक्ष इक्बाल हुसैन काझी हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. आमदार प्रशांत ठाकूर यांचा स्वागत व सत्कार संस्थेचे अध्यक्ष इक्बाल हुसैन काझी व पदाधिकाऱ्यांनी केला तर सर्व

**◆ आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती**



उपस्थित मान्यवरांचे स्वागत याकुब बेग हायस्कूल व जुनियर कॉलेजचे प्राचार्य आसीम पटेल यांनी केले.

संस्थेच्या शाळामधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी गरीब व गरजू विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष इक्बाल हुसैन काझी यांच्यातर्फे वह्या पुस्तकांचे वाटपही करण्यात आले. यानंतर नुकतेच नेशनल उर्दू हायस्कूल तलोजाचे मुख्याध्यापक पदावरून सेवानिवृत्त झालेले हनीफ मुल्ला व याकुब बेग प्राथमिक शाळेच्या लवकरच सेवानिवृत्त होणाऱ्या सहाय्यक शिक्षिका हमीदा खान यांना मान्यवरांच्या उपस्थितीत संस्थेतर्फे, संस्था संचालित सर्व शाळांच्या मुख्याध्यापक व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने भेटवस्तू देऊन करण्यात आला.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी, पनवेल एजुकेशन सोसायटी ही संस्था संस्थेचे अध्यक्ष इक्बाल काझी व त्यांच्या सहकार्यासोबत योग्य वाटचाल करत असल्याचे स्पष्ट केले व संस्थेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ज्या विद्यार्थ्यांना पारितोषिक मिळाले नाही त्यांनी नाउमेद न होता यापुढे पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांकडून प्रेरणा घ्यावी तसेच लवकरच सुरू होणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी लागणारे शिक्षण घ्यावे, असे सांगून सर्व विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या वेळी पनवेल एजुकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष अब्दुल मुकीत अब्दुल लतीफ काझी, सचिव मोहम्मद नूर हसनमिया पटेल, सचिव अलीम पटेल, अंगलो उर्दू हायस्कूल बारापाडाचे चेअरमन नवीद अब्दुल कादिर पटेल, नेशनल उर्दू हायस्कूल तळोजाचे चेअरमन साजिद नासीर पटेल, संस्थेचे सदस्य निसार अब्दुल हमीद पटेल, जुबेर अब्दुर रज्ञाक पित्तू, जव्वाद मुकीत काझी, जव्वाद मन्सूर पटेल, सर्व शाळांचे मुख्याध्यापक अथवा प्राचार्य, पत्रकार, पालक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन शिरीन सय्यद यांनी केले. आभार अब्दुल मुकीत, अब्दुल लतीफ काझी यांनी मानले.

## डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय राजकारणातील हिंदुत्व आणि हिंदुराष्ट्रवादी विचारसरणीच्या प्रवर्तकांपैकी एक मानले जाणारे तसेच भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांची रविवारी (दि. २३) पुण्यतिथी होती. त्यानिमित्त भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले.

पनवेल येथील भाजपच्या जनसंपर्क कार्यालयात झालेल्या या अभिवादनाच्या कार्यक्रमावेळी ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, माजी पंचायत समिती सदस्य भुपेंद्र पाटील, पनवेल शहर सरचिटणीस अमित ओझे, युवा मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष सुमीत झुंजारराव, प्रभाग क्रमांक १७चे अध्यक्ष विजय म्हात्रे, सोशल मिडीया प्रभाग क्रमांक १८चे अध्यक्ष प्रसाद हनुमंते, सुधाकर थवई, रूपेश नागवेकर, कोमल कोळी, संजय जाधव, चंद्रकांत मंजुळे, अशोक आंबेकर यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.



## संपादकीय


# पेपरफुटीला चाप

**शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश आणि नोकऱ्यांच्या भरतीसाठी घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांमधील अनियमितता लक्षात घेऊन केंद्र सरकारने पेपरफुटीविरोधातील नवा कायदा लागू केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्यांना आता चाप बसणार आहे.**

एनटीए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेतर्फे घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांमध्ये गैरप्रकार समोर आले आहेत. गेल्या काही दिवसांपासून नीट यूजी परीक्षांसंदर्भातील मुद्दा चर्चेत असतानाच आता यूसीजी नेट परीक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. त्यामुळे ही परीक्षाही रद्द करून पुन्हा घेतली जाणार आहे. उमेदवारांना यूसीजी नेट परीक्षेच्या माध्यमातून रिसर्च फेलोशिप, पीएचडी आणि महाविद्यालयांमध्ये सहाय्यक प्राध्यापकपदासाठीची पात्रता मिळवता येते. सर्व स्पर्धा परीक्षांमधील अनियमितता लक्षात घेऊन केंद्र सरकारने पेपरफुटीविरोधातील नवा कायदा लागू केला आहे. त्या कायद्यानुसार पेपर लीक प्रकरणात एखादी व्यक्ती दोषी आढळल्यास त्याला १० वर्षांचा तुरुंगवास आणि एक कोटी रुपयांचा दंड होऊ शकतो, तर परीक्षेला डमी उमेदवार दिल्यास तीन ते पाच वर्षांची शिक्षा आणि जास्तीत जास्त एक कोटी रुपयांच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे. दुसरीकडे परीक्षेत अनियमितता आढळून आल्यास आणि त्यामध्ये कोणत्याही संस्थेचे नाव समोर आल्यास परीक्षेचा संपूर्ण खर्च त्या संस्थेकडून वसूल करण्यात येईल. त्यासोबत मालमत्ताही जप्त केली जाऊ शकते, अशी अधिसूचना केंद्र सरकारने जारी केली आहे. हा नवा कायदा १ जुलैपासून लागू होणार असल्याचे म्हटले आहे. यूजीसी नेट, यूपीएससी, एससीसी, रेल्वे भरती, बँकिंग इत्यादी परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांवर कठोर कारवाई करण्यासाठी मोदी सरकारने फेब्रुवारीमध्ये हा कायदा आणला होता. पब्लिक एक्झाम कायदा २०२४ असे या कायद्याला नाव देण्यात आले आहे. या कायद्याचा उद्देश सर्व सार्वजनिक परीक्षांमध्ये पारदर्शकता आणणे आणि स्पर्धा करणाऱ्या तरुणांना कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही याची खात्री देणे असा आहे. याखेरिज एनटीएद्वारे घेतल्या जाणाऱ्या परीक्षा प्रक्रिया पारदर्शक, सुरळीत आणि निष्पक्ष पद्धतीने पार पडण्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने तज्ज्ञांचा सहभाग असलेली एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. ही समिती मंत्रालयाला परीक्षा प्रक्रिया यंत्रणेतील सुधारणा, माहिती साठ्याच्या नियमाधारीत व्यवस्थेतील सुधारणा आणि एनटीएची संरचना तसेच कार्यपद्धतीबद्दल शिफारसी सादर करेल. हा आदेश जारी झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत समिती आपला अहवाल मंत्रालयाला करेल, असेही शिक्षण मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. नीट आणि युजीसी-नेट परीक्षांवरून सुरू असलेल्या वादानंतर आता एनटीएचे महासंचालक बदलण्यात आले आहेत. भारत व्यापार संवर्धन संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक प्रदीप सिंह खरोला यांच्याकडे एनटीएच्या महासंचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. दरम्यान, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी शैक्षणिक क्षेत्रात घडत असलेल्या घटनांची गांभिर्याने दखल घेतली असून विद्यार्थी आमच्या देशाचे भविष्य आहेत. अशा संवेदनशील प्रकरणात कुणीही अफवा पसरवण्याचा प्रयत्न करू नये. या गोष्टीचे राजकारण होऊ नये. सरकार एकाही गुन्हेगाराला सोडणार नाही, असे स्पष्ट केले आहे. शिक्षण हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. चांगले शिक्षण घेऊन उद्याची पिढी घडणार आहे. म्हणूनच केंद्र सरकारने यावर लक्ष केंद्रित करून कठोर कायद्यासह विविध उपाययोजना केल्या आहेत.

# भूमिपुत्रांचे दैवत स्व. दि. बा. पाटील

भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांचे दैवत लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचा आज स्मृतिदिन. त्यांनी आपले आयुष्य सर्वसामान्य जनतेसाठी वेचले. या लढवय्या नेत्याच्या कार्याचा घेतलेला आढावा...



१९७०च्या दरम्यान मुंबईवरील लोकसंख्येचा वाढत जाणारा भार कमी व्हावा यासाठी मुंबईला पर्याय म्हणून नवी मुंबई हे नवे शहर वसवण्याच्या दृष्टीने तत्कालीन महाराष्ट्र सरकारने पावले उचलण्यास सुरुवात केली. यासाठी १७ मार्च १९७० रोजी सिटी अॅण्ड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (सिडको)ची स्थापना केली. या सिडकोने पनवेल, उरण आणि बेलापूर पट्ट्यातील ९५ गावातील ५० हजार एकर जमीन संपादनाचा निर्णय घेतला. इतकेच नव्हे, तर पुढे येऊ घातलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट म्हणजेच जेएनपीटीसाठीही सिडकोच्या माध्यमातून भूसंपादन केले जात होते.

मिठागरे आणि शेती हेच उदरनिर्वाहाची साधने असलेला या भागातील शेतकरी हवालदिल झाला. १५ हजार एकरी जमीन घेण्याच्या प्रयत्नात सिडको असताना दि. बा. पाटील यांनी एकरी ४० हजार रकमेची मागणी केली. 'दिबा' त्या काळी पनवेल-उरण भागातून आमदार होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी विधानसभेचे सभागृह दाणाणून सोडणारे नेते अशी ख्याती त्यांची होती. सिडकोच्या भूसंपादनामुळे भविष्यातील संकटाची जाणीव 'दिबां'ना झाली आणि त्यांनी ज्यांच्या जमिनी घेतल्या जाणार होत्या, त्यांच्यासाठी आंदोलनाची हाक दिली.

शेतकऱ्यांच्या मागणीला कुणीही दाद देईना. त्यामुळे १९८४च्या जानेवारीत जासई गावच्या हुतात्मा मैदानात मोठ्या संख्येत शेतकरी जमले. दि.बा. पाटील हे त्यांचे नेते होते. वसंत पाटील हे त्या वेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यांनी एकरामागे ४० हजार रुपये देण्याऐवजी २१ हजार रुपये देण्याचे मान्य केले. त्यानंतर २७ हजारापर्यंत आले. सरकारच्या मनमानीविरोधात उरण, पनवेल परिसरातील ५० हजारांहून अधिक शेतकरी दास्तान फाट्यावर जमा झाले. इथे जमीन संपादन करायला आलेल्या अधिकारी आणि पोलिसांसोबत शेतकऱ्यांचा संघर्ष झाला. त्या वेळी पोलिसांकडून करण्यात आलेल्या लाठीमार, गोळीबारात नामदेव घरत (चिर्ले), रघुनाथ ठाकूर (धुतूम), कमळाकर तांडेल (पागोटे), महादेव पाटील (पागोटे) आणि केशव पाटील या शेतकऱ्यांचा मृत्यू झाला.

या संघर्षानंतर राज्य सरकारने नमते घेत 'दिबां'शी चर्चा केली. 'दिबां'नी मांडलेली योजना पुढे केवळ रायगडकरांच्या नव्हे, तर अवघ्या महाराष्ट्रातील प्रकल्पग्रस्तांसाठी वरदान ठरली. ती योजना म्हणजे, साडेबारा टक्क्यांचा विकसित भूखंडाचा मोबदला. जासईच्या या आंदोलनामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना साडेबारा टक्के योजनेंतर्गत विकसित भूखंड देण्याचा निर्णय ऑक्टोबर १९९४मध्ये झाला. म्हणजे एखाद्या शेतकऱ्याची जमीन भूसंपादनात गेल्यास त्या जमिनीला एकरी भाव आणि त्याचसोबत साडेबारा टक्के विकसित भूखंड आणि तोही त्याच भागात देणे बंधनकारक झाले.

जासईच्या ज्या आंदोलनाने 'दिबां'ना प्रकल्पग्रस्तांचा नेता बनवले. जासई गावातील 'दिबां'च्या संग्राम नावाच्या छोट्याशा घरात आजही बलिदान दिलेल्या पाच शेतकऱ्यांचे फोटो लावलेले आहेत. लोकांनी 'दिबां'ना दैवत मानले, मात्र 'दिबां'नी या पाच हुतात्म्यांना दैवत मानले, असे त्यांचे पुत्र अतुल पाटील सांगतात. केवळ जनतेच्या पाठिंब्यावर महाराष्ट्र सरकारला नमते घ्यायला लावणारा हा नेता कोण होता, तर शेतकरी कुटुंबातला मुलगा. १३ जानेवारी १९२६ रोजी जन्म झालेल्या 'दिबां'नी स्वातंत्र्य संग्रामातही सहभाग नोंदवला होता. तरुण असताना ते १९४२च्या चळवळीत सहभागी झाले होते.

लोकनेते दि.बा. पाटील हे शिक्षणाबाबत जागृत कुटुंबात वाढल्याने त्यांचे वकिलीपर्यंत शिक्षण झाले. बीए मुंबईतून, तर पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातून एलएलबीचे शिक्षण घेतले. प्रकल्पग्रस्तांचे नेते म्हणून ते पुढे नावारूपाला आले, मात्र त्यापूर्वीही त्यांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान दिले आहे.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन म्हणतात, दि.बा. पाटील यांना केवळ प्रकल्पग्रस्तांचे नेते म्हणून पाहू नका, त्यांनी महाराष्ट्रातल्या धरणग्रस्तांसाठी केलेल्या कामाचाही उल्लेख व्हायला हवा. त्यांनी आदिवासी, शेतकरी, स्त्रियांचेही प्रश्न सभागृहात मांडले. ते लोकांच्या प्रश्नांवर बेधडकपणे आवाज उठवण्यासाठी ओळखले जात. १९५१ साली वकिली पूर्ण झाल्यानंतर १९५२ साली ते कुलाबा (आताचा रायगड) जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणुकीत बहुमताने विजयी झाले होते. या निवडणुकीद्वारेच त्यांनी राजकारणात खऱ्या अर्थी प्रवेश केला होता, मात्र याच काळात संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनासाठी बांधणी सुरू झाली होती. आपला वकिली व्यवसाय सांभाळत लोकप्रतिनिधी म्हणून ते उत्तम प्रकारे काम करीत होते, मात्र १९५६मध्ये 'दिबां'नी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीप्रश्नी लोकल बोर्डाचा राजीनामा दिल्याची माहिती भाजपचे पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर देतात. त्यानंतर १९५७ साली 'दिबां'नी पहिल्यांदा विधानसभा निवडणूक लढवली. ते पनवेलमधून उमेदवार होते आणि ते विजयीही झाले.

दि.बा. पाटील हे पनवेल पालिकेचे नगराध्यक्ष, महाराष्ट्राचे पनवेल-उरण विधानसभा मतदारसंघाचे चार वेळा आमदार, महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते आणि रायगडचे दोन वेळा खासदार होते. सिडको (सिटी इंडस्ट्रियल डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशन) ही सरकारी संस्था त्या वेळी नवी मुंबईची बांधणी करीत होती. त्या काळात दि.बा. पाटील यांनी नवी मुंबई सिडको आणि जेएनपीटी (न्हावा शेवा बंदर) प्रकल्पग्रस्त जनतेचे खंबीर नेतृत्व केले. शेतकरी-कष्टकऱ्यांसाठी सारे आयुष्य झिजवले. पोलिसांचा लाठीमार सहन केला तसेच कारावासही पत्करला. साधी राहणी, उच्च विचारसरणी असणाऱ्या या नेत्याच्या एका हाकेला हजारो, लाखोंच्या संख्येने ओ देणारे कार्यकर्ते होते.

'कष्टकऱ्यांचा योद्धा' पुस्तकात दि.बां. पाटील यांच्या संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील योगदानाबद्दल विस्तृत माहिती सापडते. १९५७च्या सुमारास ज्या वेळी बेळगावच्या सीमेवर जाऊन महाराष्ट्रासाठी आंदोलन करण्याचे ठरले, त्या वेळी पनवेल, अलिबाग भागातून दि.बा. पाटील आणि दत्ता पाटील यांच्यावर आंदोलक आणण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. सीमेवर हे नेते पोहचल्यावर त्यांना दोनवेळा अटक झाली. मग सोडून देण्यात आले. तेव्हा दि.बा. पाटील आणि दत्ता पाटील परतत असताना निपाणीजवळ सत्याग्रह सुरू असल्याचे दिसले, तर त्यांनी त्यात सहभाग घेतला. या वेळी मात्र 'दिबा' आणि दत्ता पाटलांना पोलिसांनी सोडले नाही. त्यांना एका वर्षांचा तुरुंगवास ठोठावला, पण त्यांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी ही शिक्षाही भोगली. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतरही १९६२, १९६७, १९७२ आणि १९८० अशा वेळी आमदार म्हणून विधानसभेत गेले. पुढेही सीमाभागातील मराठीजनांवरील अन्यायाविरोधात प्रा.एन.डी. पाटलांच्या खांद्याला खांदा लावून दि. बा. पाटील यांनी विधानसभेत आवाज उठवला. १९८३-८४ दरम्यान ते महाराष्ट्राच्या विधानसभेत विरोधी पक्षनेतेही होते.

२४ जून २०१३ रोजी हृदयविकाराने 'दिबां'चे निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. त्यांच्यामागे दोन मुले, दोन मुली, स्नुषा, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. पनवेल येथील अमरधाम स्मशानभूमीत त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

मागील काही वर्षांपासून 'दिबां'ना श्वसनाचा तसेच छातीतील कफाचा त्रास होत होता. त्यामुळे त्यांच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू होते. येथेच उपचारादरम्यान त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला व त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांचा मृतदेह आधी त्यांच्या पनवेल येथील (संग्राम) घरी नेण्यात आलेला. रायगडमधील सर्वपक्षीय नेत्यांनाही 'दिबां'च्या अंत्यदर्शनासाठी उपस्थित लावली होती. त्यानंतर त्यांचे पार्थिव उरण-पनवेल आगरी समाजाच्या महात्मा फुले सभागृहात अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. त्यांच्या अंत्यदर्शनासाठी जनसमुदाय लोटला होता. या अंत्ययात्रेत हजारोच्या संख्येने 'दिबा' समर्थक आणि स्थानिक सहभागी झाले होते. अशा या नेत्याला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन. **(साभार : इंटरनेट)**

## बदलते तंत्रज्ञान

# जेमिनी अॅप आता करून देणार तुमची 'ही' कामे

गुगलचे सीईओ सुंदर पिचाई यांनी ६ डिसेंबर २०२३ रोजी एक्स (ट्विटर) अकाउंटवरून एक व्हिडीओ आणि एक पोस्ट शेअर करून आपले नवीन आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) मॉडेल लाँच केल्याची घोषणा केली होती. एआय टूल्स एखादी वस्तू किंवा गोष्ट माणसांप्रमाणे समजवून सांगण्यासाठी डिझाईन करण्यात आले आहे. 'जेमिनी' हे एक कृत्रिम बुद्धिमत्ता मॉडेल आहे जे समजून घेणे, तर्क करणे, कोडिंग आणि नियोजन यांसारख्या गोष्टी करण्यात मदत तर विद्यार्थ्यांपासून ते जिज्ञासू लोकांपर्यंत लोकांना दैनंदिन जीवनात मदत करण्यासाठी इतर मॉडेल्सपेक्षा जास्त चांगले काम करतो आहे.




आता हे पाहता गुगलचे सीईओ सुंदर पिचाई यांनी एक महत्वाची घोषणा केली आहे. सुंदर पिचाई भारतात जेमिनी मोबाईल अॅप लाँच करीत आहेत जे इंग्रजीसह नऊ भारतीय भाषांमध्ये उपलब्ध असणार आहे. या स्थानिक भाषांना Gemini advancedमध्ये जोडली जाणार आहे. याचबरोबर Gemini advancedमधील नवीन फीचर्स जसे की, डेटा विश्लेषण, फाईल अपलोड असे फीचर्स तर गूगल मेसेजमध्ये जेमिनी बरोबर इंग्रजीमध्ये चॅट करण्याची सुविधा लाँच करीत असल्याची घोषणा त्यांनी एक्स (ट्विटर) अकाउंटवरून केली आहे. गुगलचे सीईओ सुंदर पिचाई यांचे ट्विट एकदा तुम्हीसुद्धा बघा..

जेमिनी मोबाईल अॅप इंग्रजीसह हिंदी, बंगाली, गुजराती, कन्नड, मल्याळम, मराठी, तमिळ, तेलगू आणि उर्दू या नऊ भारतीय भाषांना सपोर्ट करणार आहे. एखादी रेसिपी बनवायची असेल, सोशल मीडियावर पोस्ट करण्यासाठी कॅप्शन हवे असेल तेव्हा हा अॅप तुम्हाला टाईप करण्याची, बोलण्याची किंवा इमेज जोडण्याची परवानगी देईल. त्यामुळे प्रत्येकाला आपापल्या भाषेनुसार एआय मदत करणार आहे. हे गुगलच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

अँड्रॉईडवर Gemini अॅप डाउनलोड करा. त्यानंतर तुम्ही कॉर्नर स्वाइप करून, फोनवरील पॉवर बटण दाबून किंवा Hey Google बोलून जेमिनी वापरू शकता, तसेच Google असिस्टंटमध्ये तुम्हाला आवडलेली अनेक व्हॉईस फीचर्स जेमिनी अॅपद्वारे उपलब्ध असतील. टायमर सेट करणे, कॉल करणे आणि रिमाइंडर्स सेट करणे आदी अनेक काम जेमिनी एआयद्वारे केली जातील.

# कर्जतमध्ये हळदीपूर मठाधिपतींचे आगमन



**सदाशिव समारंभां शंकराचार्य मध्यमाम।**
**वामनाश्रम पर्यंतां वंदे गुरुपरंपराम।।**

श्री संस्थान शांताश्रम काशी तथा हळदीपूर मठाधिपती श्री श्री वामनाश्रम महास्वामीजी प्रथमच कर्जतमध्ये येत आहेत. गुरूसेवा समिती रायगड यांच्या वतीने हा उपक्रम होत आहे. महास्वामीजी वैश्य समाजाचे गुरू आहेत. ते कर्जतमध्ये तीन दिवस राहणार असल्याने वैश्य समाज बांधवांमध्ये आनंदी वातावरण आहे. त्यांचे दर्शन घेण्यासाठी व आशिर्वाचनासाठी मंगळवारी सायंकाळी एक विशेष सोहळा आयोजित करण्यात आला आहे. स्वामीजी रायगड जिल्ह्यातील विविध गावात जाऊन विशेष सभा घेऊन जनजागृती करीत आहेत.

वैश्य इतिहास असे सांगतो की, केरळ देवभूमी आहे. तेथेच उपेश बाबुंचा जन्म झाला होता. श्री जगद्गुरु शंकराचार्यांनी जेव्हा सनातन वैदिक धर्मामध्ये आलेल्या वाईट गोष्टी नष्ट करण्यासाठी संपूर्ण भारतभर यात्रा करून हिंदू धर्माची विजयी पताका साऱ्या विश्वात फडकवली. त्याचप्रमाणे श्री श्री वामनाश्रम महास्वामीजींनी वैश्य समाजाची खंडित झालेली गुरूपरंपरा आणि समाजात आलेल्या वाईट गोष्टी दूर करून वैश्य समाज पुन्हा वैभवशाली करण्यासाठी स्वामीजी केरळ, महाराष्ट्र, गोवा येथे यात्रा करून उत्तरेतील गुजरात, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेशमध्ये जाऊन यात्रा करून जनजागृती केली व सातत्याने करीत आहेत.

यंदा ते सासवणे-अलिबाग, पेण, खोपोली, कर्जत, पनवेल मार्गे खारघर कडे जाणार आहेत. कर्जतमध्ये स्वामीजी सोमवारी येणार असून त्यांचा दर्शन सोहळा व अशिर्वाचन सोहळा मंगळवारी वेणगाव येथील श्री विठ्ठल मंदिरात सायंकाळी पाच वाजल्यापासून सुरू होणार आहे. त्यानंतर ते बुधवारी पनवेलकडे मार्गस्थ होणार आहेत. त्यांचा पदस्पर्श कर्जत तालुक्यात होणार आहे व ते दोन दिवस येथे मुक्कामी राहणार असल्याने भाविकांनी जोरदार तयारी सुरू केली आहे.

स्वामीजींनी गेल्या वर्षी ५ ऑक्टोबर २०२२ (विजयादशमी) ते २३ एप्रिल २०२४ (अक्षय्य तृतीया) या कालावधीत कालडी (केरळ) ते काशी (वाराणसी) अशी शांकर एकात्मता पदयात्रा काढली होती. त्या वेळी रायगड जिल्ह्यातून गेले होते. अनेक वैश्य समाजाचे व अन्य समाजाचे शिष्य व भाविक यामध्ये सहभागी झाले होते. त्या वेळी पोलादपूर, महाड, माणगाव, नागोठणे, पेण, पनवेल हून ठाणे जिल्ह्यातून मार्गस्थ झाले होते. वैश्य गुरु प. पू .श्री श्री वामनाश्रम महास्वामीजींचे कर्जतमध्ये भक्तिपूर्ण स्वागत..

**-विजय मांडे, कर्जत**

## क्लिक...क्लिक...!

(छाया : सुधीर नाझरे)



**मुरुड : येथील गायमुख परिसरात पौर्णिमेला मोठे उधाण आल्याने मोठमोठ्या लाटा खडकावर आदळत होत्या.**

## आरोग्य प्रहर

# सलग तीन दिवस उपाशी राहिल्यास होतील गंभीर परिणाम

उपवास हा भारतीय परंपरेचा अविभाज्य भाग आहे आणि प्राचीन काळापासून तो पाळला जातो. त्यामुळे मानवी शरीराला जशी भूक नियंत्रणात ठेवण्यासाठी अन्नाची गरज असते; तसेच या शरीरात दीर्घकाळ भूक सहन करण्याची ताकददेखील असते. अनेक तास आपले शरीर काहीही न खाताही सुदृढ राहू शकते, परंतु हळूहळू काहीही न खाल्ल्यामुळे गंभीर शारीरिक बदल होऊ शकतात.



सलग तीन दिवसांहून अधिक दिवस काहीही खात नाही तेव्हा तुमच्या शरीरात अनेक शारीरिक बदल होतात. सुरुवातीला तुमचे शरीर ऊर्जेसाठी साठवलेले ग्लुकोज वापरते. पहिल्या २४ तासांत हे ग्लायकोजेन संपुष्टात येते. मग तुमचे शरीर ग्लुकोनोजेनेसिस सुरू करते आणि अमिनो ॲसिडसारख्या नॉन-कार्बोहायड्रेट स्रोतांपासून ग्लुकोज तयार करते. डॉक्टरांनी सांगितले की, दुसऱ्या दिवसापर्यंत तुमच्या शरीरात केटोसिस सुरू होते आणि साठलेल्या चरबीचे विघटन करण्यास सुरुवात करते.

आपल्या उपवासाचे दिवस वाढतात, तसतसे शरीर तुमची चयापचय, इन्सुलिनची पातळी कमी करून आणि नॉरपेनेफ्रिनची पातळी वाढवून अनुकूल होते. त्यामुळे इन्सुलिनमधील कमतरता भरून काढणे, मूत्रपिंडातून जास्तीचे मीठ व पाणी बाहेर टाकण्यासदेखील मदत होते. बहुतेकदा पाणी कमी झाल्यामुळे वजन कमी होते. तीन दिवसांमध्ये नॉरपेनेफ्रिनच्या वाढीमुळे तुमची चयापचय प्रक्रिया तात्पुरती वाढू शकते, परंतु शेवटी ऊर्जा वाचवण्यासाठी त्याची गती मंद होईल कारण शरीर अन्नाच्या कमतरतेशी जुळवून घेते.

**१. निर्जलीकरणाचा धोका** : शरीराला कोणत्याही प्रकारे पाणी न मिळाल्यास निर्जलीकरणाचा धोका संभवतो. तो धोका टाळण्यासाठी भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे.

**२. रक्तातील साखरेत घट** : उपवासामुळे रक्तातील साखरेची पातळी कमी होते. त्यामुळे चक्कर येणे, डोकेदुखी या समस्या उद्भवतात.

**३. निद्रानाश** : पोटात अन्न नसल्याने त्याचा परिणाम झोपेवरही पाहायला मिळतो. उपवासामुळे झोप येत नाही. त्यामुळे थकवा, चिडचिडदेखील होते.

# महिलाशक्तीमुळे पक्षाची यशस्वी वाटचाल

## आमदार महेंद्र दळवी यांचे प्रतिपादन





### मुरूड शिवसेनेचा महिला मेळावा उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

राजकरणात महिलांचे संघटन असणे खूप महत्त्वाचे आहे. महिलांनीही सक्रिय सहभाग घेणेसुद्धा आवश्यक आहे. महिलांचे संघटन ज्या पक्षाकडे आहे तोच पक्ष राजकीय जडणघडणीत यशस्वी वाटचाल करणार आहे. संघटन कौशल्य महिलांकडे असून राजकारणातील त्या महत्त्वाच्या शिलेदार असल्याचे प्रतिपादन आमदार महेंद्र दळवी यांनी केले.

शहरातील माळी समाजगृहात शिवसेना तालुका महिलांचा मेळावा तसेच महिला पदाधिकाऱ्यांना विविध पदांचे नियुक्तीपत्र देण्याचा कार्यक्रम झाला. या वेळी आमदार दळवी बोलत होते.

व्यासपीठावर माजी जि. प.सदस्य मानसी दळवी, जिल्हा महिला संपर्कप्रमुख संजवनी नाईक, जिल्हा महिला संघटिका तृप्ती पाटील, माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील, निर्मला म्हात्रे, मंदा ठाकूर, कोमल माळी, वैशाली रोटकर, षझनत हसवारे, बोर्ली सरपंच स्वप्ना जयपाटील, अलिबाग तालुका प्रमुख भाग्यता पाटील, माजी नगरसेविका युगा ठाकूर, शिवसेनेचे नेते भाई सुर्वे, जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे, तालुकाप्रमुख रूषिकांत डोंगरीकर, तालुका संघटक दिनेश मिणमिणे, जिल्हा संघटिका व महिला पदाधिकारी व मोठ्या संख्येने महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

या मेळाव्यात महिला तालुका पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करून एकूण १४० पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. माजी जि.प. सदस्या मानसी दळवी म्हणाल्या की, ज्या महिला कार्यकर्त्यांच्या नियुक्त्या केल्या आहेत त्यांनी चोखपणे आपली भूमिका पार पाडून आपल्या विभागाच्या समस्या सोडविण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले. प्रचार व पक्षाची ध्येधोरणे लोकांना पटवून सांगून लोकांना आपलेसे करा. लोकांमध्ये फिरा त्यांच्या समस्या जाणून घेऊन, त्या समस्या आमदार साहेबांपर्यंत पोहचवा, असे त्यांनी सांगितले.

माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील यांनी, आमदार दळवी यांनी मुरूड तालुक्याला भरभरून विकासनिधी दिला असून शहराचा कायापालट केल्याचे सांगितले, तसेच अशा कार्यकर्तृत्व असलेल्या आमदाराच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले पाहिजे, असे आवाहन केले.

# कर्जतमध्ये नऊ इमारती, ९९ घरे धोकादायक

## ७० घरे दरडींच्या छायेत; तत्काळ स्थलांतराच्या सूचना

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत नगरपालिकेकडून शहरातील धोकादायक इमारती, घरांचे सर्व्हेक्षण पूर्ण झाले आहे. त्यात विविध भागातील नऊ इमारती आणि ९९ घरे धोकादायक ठरविण्यात आली आहेत. मुद्रे भागात मागील वर्षांपासून दरडी कोसळण्याचा धोका वाढला असल्यामुळे त्या भागातील आणि अन्य भागातील ७० घरे दरडींच्या छायेत असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. धोकादायक इमारतींमधील कुटुंबांना तत्काळ स्थलांतराच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

कर्जतमधील काही जुन्या इमारती अखेरच्या घटका मोजत आहेत. अशा इमारतींना नगरपालिकेने धोकादायक ठरवले आहे. गेल्या चार महिन्यांपासून नगरपालिकेच्या पथकाकडून सर्व जुन्या इमारतींचे सर्व्हेक्षण करण्यात आले. अहवाल तयार केल्यानंतर कर्जत नगरपालिका हद्दीमधील नऊ इमारती, ९९ घरे धोकादायक ठरविण्यात आली. त्या सर्व घरांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित होण्याची नोटीस पालिकेने बजावली आहे. धोकादायक इमारतींमध्ये पिंपुटकर वाडा–दहिवली, नाझ व्हिला–दहिवली, मुख्य शहरातील तेलवणे बिल्डिंग, डागा बिल्डिंग, भुसारी चाळ, गुजराथी वाडा, प्रेमसिंधू अपार्टमेंट यांचा समावेश आहे.

येथील नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित होण्याची नोटीस पालिकेने बजावली आहे, तर ७० घरांना दरडीच्या छायेत असल्याबद्दल नोटीस बजावण्यात आल्याची माहिती मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी दिली.

# चौक येथे चिंबोऱ्या, नदीचे मासे घेण्यासाठी गर्दी

**चौक : प्रतिनिधी**



चौक बाजारपेठेत चिंबोरी, गावठी नदीचे मासे, मुठे आणि वलगनीचे मासे घेण्यास तुफान गर्दी होती. त्यामुळे पोलिसांच्या गाडीलादेखील वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. त्यातच रविवार (दि.२३) सुट्टी असल्यामुळे बाजारपेठ गच्च झाली.

गेले दोन दिवस हलका, कधी सरींनी पाऊस पडत आहे. त्यामुळे काही प्रमाणात नदीला पाणी येत आहे. मांसाहारी खवय्ये ज्याची आतुरतेने वाट पाहत असतात त्या पावसाळी नदी काठच्या चिंबोरी, मुठे, खेकडी, मासे आणि वलगनीचे मासे बाजारात येऊ लागले आहेत. चौक बाजारपेठेत मटण, मच्छी मार्केट नसल्याने, विक्री करण्यास येणारे चौक पोलीस दूरक्षेत्र यांच्यासमोरील रस्त्याच्या कडेला मोकळ्या जागेत बसतात. त्यामुळे पोलिसांच्या गाडीलादेखील वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागतो.

४० ते ५० विक्रेते टोपली घेऊन बसतात. चिंबोरी, मुठे, मासे घेण्यास खवय्यांची गर्दी झाल्याने खाऱ्या पाण्याच्या मच्छीकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले होते. त्यामुळे त्यांची नाराजी दिसत होती.

मळे मासे ४०० रुपये, काळ्या पाती ६०० रुपये, पाच चिंबोरीचा वाटा २०० रुपये, सफेद पितलांडी २०० रुपये प्रति किलो दराने विक्री केली जात आहे.

# ‘माशिप्र’ मंडळास सीबीएसई शाळेची मान्यता

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई शाळेला महाराष्ट्र शासनाने नुकतीच मान्यता दिली आहे. या शैक्षणिक वर्षापासून ही इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू झाली असून या शाळेत प्रवेश देण्यास सुरुवात झाली आहे, अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव अशोक साबळे यांनी दिली.

माणगाव शहरात इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत, मात्र केंद्रीय स्तरावरील सीबीएसई माध्यमाची इंग्रजी शाळा नव्हती. याबाबत मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या कडे सातत्याने अनेक पालक आणि विद्यार्थी मागणी करीत होते. याची दखल घेऊन या वर्षापासून प्ले ग्रुप ते चौथीपर्यंत शाळा सुरू झाली आहे. त्यामुळे शेकडो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यापूर्वी हे विद्यार्थी अन्य ठिकाणी एक ते दोन तास प्रवास करीत जात होते. आता शहरात शाळा सुरू झाल्याने विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

पुढील शैक्षणिक वर्षापासून पाचवी ते बारावी (विज्ञान, वाणिज्य, कला)पर्यंत शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय सुरू होणार आहे. ही शाळा आणि कॉलेज माणगाव शहरातील निजामपूर रोड मार्गावरील गणेश नगर येथील अमित कॉम्लेक्स समोरील विस्तीर्ण जागेत होत आहे. या शाळेत सर्व प्रकारच्या अत्याधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सध्या ही शाळा तात्पुरत्या स्वरूपात शिपुरकर आणि वाघरे इंग्रजी माध्यमाच्या शाळेत सुरू असून लवकरच ती नियोजित गणेश नगर येथे सुरू होणार आहे.

या महत्त्वाकांक्षी शैक्षणिक प्रकल्पात आंतरराष्ट्रीय पातळीवरील शिक्षणासोबतच हॉर्स रायडिंग, स्विमिंग, फुटबॉल, तिरंदाजी, संगीत, कला, नाटक, मैदानी खेळ, व्यायाम शाळा, प्रयोगशाळा, रेबोटीक, संगणक प्रशिक्षण आदी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार आहोत अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष राजीव साबळे यांनी दिली.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

मौजे भिलवले, ता. खालापुर, जि. रायगड येथील जमीन मिळकत :–

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.–आर.–पॉ. | रुपये | पैसे |
| श्री. नंदकुमार रामकृष्ण वनवारी | ८८ | २ | ०२–३४–५० यापैकी विक्री केलेले क्षेत्र ००–७३–२६ | ७ | ३२ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**दिनांक: २४/०६/२०२४**

**सही/–**
**अल्पेश अनंत कराळे**
**(ॲडव्होकेट)**

कार्यालयीन पत्ता :– २०३ व २०४, दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक (अंबिका नाका), पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड. मो. नं. ९९२२३६८१२१




रोहा : भाजप तालुका सरचिटणीस एकनाथ ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त तालुकाध्यक्ष अमित घाग, युवा मोर्चा सरचिटणीस रोशन चाफेकर, सचिन मोरे, अमोल यांनी शुभेच्छा दिल्या.

# नागाव ग्रामपंचायतीतर्फे योग दिनानिमित्त कार्यक्रम

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त नागाव ग्रामपंचायतीतर्फे ग्रामपंचायत सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी एनबी डान्स फिटनेसचे संचालक व प्रशिक्षक नवनीत भालवलकर यांनी उपस्थितांना प्रात्याक्षिकांच्या माध्यमातून योगांचे महत्त्व सांगितले.

योगाच्या सर्व आसनांचे फायदे मिळविण्यासाठी सुरक्षित आणि नियमित सराव आवश्यक आहे. योगादरम्यान श्वासोच्छवासाच्या प्रक्रियेत ऑक्सिजन घेणे आणि सोडणे ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. योगाचे फायदे लहान मुले, वृद्ध, स्त्रिया, गरोदर स्त्रिया या सर्वांनाच होतात. योगामध्ये हजारो रोग बरे करण्याचे गुणधर्म दडलेले आहेत. दैनंदिन जीवनात योगाभ्यास केल्याने आपल्याला अनेक शारीरिक व मानसिक आजारांपासून वाचवता येते. नियमित योगासने केल्याने शरीराचे कार्य सुरळीत होते. शरीराच्या वेगवेगळ्या अवयवांना योगाच्या वेगवेगळ्या आसनांचा फायदा होतो असेही भालवलकर म्हणाले.

या वेळी ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास अधिकारी श्वेता कदम, सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होत्या.




## जाहीर नोटीस

उपरोक्त विषयाकामी अर्जदार श्री. हरिभाऊ महादेव उर्फ महादू माळी, रा.सावळे, पो. रसायनी, ता. पनवेल, जि. रायगड यांनी कै. महादेव उर्फ महादू नामाजी माळी यांची उशिरा मृत्यू नोंदीचा आदेश मिळणेकामी कार्यकारी दंडाधिकारी ता. पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक ०६/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर मृत्यू नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात कार्यकारी दंडाधिकारी पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काहीएक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमाचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**(संभाजी शेलार)**
निवासी नायब तहसलिदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी पनवेल



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## e-TENDER NOTICE –

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| RFX | Description | *Esti. Cost* |
|---|---|---|
| Tend-17/24-25 RFX 7000031697 | Replacement of EHV CTs & PTs at various substations under (O&M) Circle Panvel. | Rs. 23.91 Lakhs |
| Tend-18/24-25 RFX 7000031585 | Shifiting of tower loc. No. 116 & 117 from hill top of 100kV Jite - Thal - TSS D/C line under EHV (O&M) Division Panvel. | Rs. 76.16 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee- Rs. 500/-+ GST Submission of bids from 21.06.2024 to 28.06.2024 up to 11:00 hrs, Opening date:- 28.06.2024 @ 11:30 Hrs.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID se7200@mahatransco.in

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**


# मुरूड वन कार्यालयाकडून फळझाडांचे वाटप

**मुरूड : प्रतिनिधी**



सध्या उत्तम पाऊस बरसत असल्याने वृक्षलागवड होण्यास अनुकूल वातावरण आहे. झाडांना पुरेसा पाणीपुरवठा मिळत असल्याने झाडे जोमाने वाढत असतात. परिमंडळ वन अधिकारी कार्यालय तीनवीरा व आगाखान एजन्सी फॉर हॅबिटॅट, इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने पेझारी येथील परिमंडळ कार्यालयात नुकतेच नागरिकांना मोफत फळझाडे रोपे वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला.

कार्यक्रमात एकूण १२०० फळझाड रोपे वाटप करण्यात आली. कार्यक्रमांस तिविराचे परिमंडळ वन अधिकारी डॉ. निलेश चांदोरक, संदेश बैकर, किशोर म्हात्रे, धर्मा मेंगाळ, अविनाश हंबीर, आदिवासी संस्थेचे अशोक मेंगाळ तसेच वाघजाई, कोळघर, तळशेत, वाघोडे, पोयनाड, दळवी खरोशी परिसरातील नागरिक उपस्थित होते. आगा खान संस्थेच्या अमृता पराडकर यांनी रोपे उपलब्ध करून दिली होती. सर्व रोपे आसपास राहणाऱ्या ग्रामस्थांना मोफत देण्यात आली.

# वृक्षारोपण काळाची गरज -बाबूभाई ओसवाल

**खोपोली : प्रतिनिधी**

शहरात सिमेंटची वाढती जंगले पाहता झाडांची संख्या कमी झाली आहेत. यासाठी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन हास्यक्लबचे संस्थापक व सामाजिक कार्यकर्ते बाबूभाई ओसवाल यांनी केले.

खोपोली नगर परिषद शाळा क्र.८, ९ व खोपोली हास्यक्लब यांच्या संयुक्त विद्यमाने लव्हेज शाळेच्या पटांगणात वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी प्रमुख अतिथी म्हणून ओसवाल बोलत होते.

याच वेळी शाळा क्र. ८च्या मुख्याध्यापिका प्रियंका भोईर, शाळा क्र.९चे मुख्याध्यापक श्रीराम पवार, शाळा क्र. १०चे मुख्याध्यापक निलेश थरकुडे, यांनी विचार मांडले. या कार्यक्रमासाठी हास्यक्लबचे अध्यक्ष सरदार कुलवंत सिंग, सामाजिक कार्यकर्ते किशोर पाटील, ज्येष्ठ पत्रकार जयवंत माडपे, हास्य क्लब सदस्य हेमंत नांदे, शिक्षिका वैशाली भंडारे, ज्योती आढळ, तेजस्विनी घोडके, प्रमिला कर्णूक, शितल चव्हाण, साबिया खान, रेश्मा घाडीगावकर, विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण कार्यक्रमात सहभाग घेतला.




MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tender -27 **(RFX.7000031714)** | RFx e-tender for AMC for work of repairs of 220kV Isolator, 100kV Isolator and 22kV Isolator and cable termination and joints at various substation under EHV (O&M) Division Panvel. **(Tender Fee Rs. 500/- + 18% GST)** | **Limited to Rs.15,00,000/-** |
| Tender -28 **(RFX.7000031717)** | RFx e-tender for work of strengthening of 220kV Adlab, 220kV Apta, 100MVA, 220/100kV ICT-1 and ICT-2 LV side bay from single conductor to twin conductor at 220/100/22 kV Tambati Substation under EHV (O&M) Division Panvel . **(Tender Fee Rs. 500/- + 18% GST.)** | **Rs.21,18,162/** |

EMD 1% of estimated cost for each Tender. **Submission of bids from 24.06.2024 to 01.07.2024 up to 23:59 hrs, Opening date:-02.07.2024 @ 11:00 Hrs.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The ADDL. Executive Engineer (O) Tel No. 022-27465410, Mob. No. 8530095666 E-mail ID ee7210@mahatransco.in

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER, EHV(O&M) DN PANVEL**

# छत्री दुरूस्त करणाऱ्यांची कामाअभावी होतेय परवड

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मुसळधार पाऊस सुरू झाला की छत्री, रेनकोट आदींच्या वस्तूंची खरेदी व दुरुस्ती हे दर वर्षी ठरलेले असते, मात्र या छत्री दुरुस्ती करणाऱ्या कारागिरांच्या हाताला सद्या काम नसल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे जिकिरीचे झाले आहे.

राज्यात जून महिन्यापासून पावसाला सुरूवात होते. बाजारात दरवर्षी वेगवेगळ्या प्रकारच्या आकर्षक आणि नवनव्या डिझाइनच्या छत्र्या शंभर रूपयांपासून विकायला असतात. त्यामुळे जुनी झालेली छत्री पुन्हा दुरूस्ती करून वापरण्यापेक्षा नवीन छत्रीचा मोह लोकांना आवरता येत नाही. त्यात दरवर्षी बाजारात विविध रंगाच्या व आकर्षित करणाऱ्या छत्र्या येतात. लहान मुलांपासून ते थोरांपर्यंत सर्वांच्या पसंतीला उतरतील अशा छत्र्या बाजारात दाखल होतात. त्यामुळे सध्या अनेकांना नवनवीन छत्र्या खरेदी करण्याचा मोह आवरला जात नाही. त्यामुळे कोणीही जुनी छत्री दुरुस्ती करण्याच्या भानगडीत पडत नाही. त्यामुळे दारोदारी छत्र्या दुरुस्ती करणाऱ्याना दुरुस्तीची कामे मिळत नसल्याने त्यांनी देखील आपला रोजगाराचा माध्यम बदलला आहे. फक्त चारच महिने छत्र्या दुरुस्तीची कामे हाताला लागतात.



छत्र्या दुरुस्तीमध्ये तार बांधणे, गजरा बांधणे, मूठ फिटिंग आदी कामे असतात. त्यासाठी लागणाऱ्या साहित्यवर जीएसटी लागत असते. त्यामुळे छत्र्या दुरुस्त करणे ग्राहकांना देखील परवडत नाही. रेनकोट, जॅकेट्स यामुळे छत्री वापरणे कमी झाले आहेत. यामुळे छत्री दुरूस्ती करणाऱ्या कारागीरांवर उपासमारीची वेळ आली आहे. नवी मुंबई शहरातील अनेक वर्दळीच्या ठिकाणी कारागीर कामात मग्न झाल्याचे पहायला मिळत आहेत, पण त्यांना पूर्वी जशी कमाई होत असे तशी आता होत नसल्याचे छत्री दुरुस्ती करणारे कारागीर गणेश पांढरे यांनी सांगितले.

मागील चार दिवस सर्वत्र मुसळधार पावसाने झोडपले. आठ महिने अडगळीत ठेवलेली छत्री पाऊस सुरू झाला की आपोआपच बाहेर येते. बाजारात चायना मार्केटमधील स्वस्त यूज अँड थ्रो छत्र्या मिळत असल्याने जून्या छत्र्या दुरूस्तीकरण्याकडे लोक जास्त लक्ष देत नाही. यामुळे छत्र्या दुरूस्ती करणार्या कारागीरांची संख्या खूप कमी झालेली पहायला मिळत आहे. बाजारात दरवर्षी वेगवेगळ्या प्रकारच्या आकर्षक आणि नवनव्या डिझाइनच्या छत्र्या १०० रूपयांपासून विकायला असतात. त्यामुळे जूनी झालेली छत्री पुन्हा दुरूस्ती करून वापरण्यापेक्षा नवीन छत्रीचा मोह लोकांना आवरता येत नाही. काही ठिकाणी रस्त्याच्या आडोशाला किंवा दारोदारी छत्र्या दुरुस्ती करणारे कारागीर दिसत असत, पण सद्या त्यांची संख्या विरळ होऊ लागली आहे. त्यात करागिरांनी दुरुस्तीसाठी लागणारे दर ही वाढवले आहेत. त्यामुळे त्या पैश्यात आणखी पैसे टाकले तर नवीन छत्री येईल असा विचार नागरिकांन कडून केला जातो.

छत्र्या दुरुस्तीच्या खर्चात नवी छत्री मिळत असल्याने तसेच दुरुस्ती केलेली छत्री किती दिवस चालेल याचादेखील भरोसा नसतो. त्यामुळे दुरुस्ती साठी कोणी पैसे खर्च करण्याच्या भानगडीत सहसासहशी पडत नाही. पूर्वी दरोदारी छत्री दुरुस्ती करणारे कारागीर फिरायचे, पण सध्या कोपऱ्याच्या ठिकाणी असणारे गटई कामगारच छत्र्यांची दुरुस्ती करून देतात.

> पूर्वी पावसाळ्यात चार महिने आमचा धंदा तेजीत असायचा, पण गेल्या दोन ते तीन वर्षांपासून धंदा कमी झाला आहे. त्यामुळे दिवसाला शंभर ते दीडशेच रुपये मिळतात. कधी कधी रिकाम्या हाती परतावे लागते.
> –गणेश पांढरे, कारागिर, नेरूळ

# नेरूळ, जुईनगर उद्यानांतील खेळाच्या साहित्याची मोडतोड

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई शहरामध्ये पालिकेच्या वतीने विविध विभागांमध्ये आकर्षक उद्याने उभारण्यात आली आहेत, मात्र या उद्यानांमध्ये बसविण्यात आलेली विविध खेळाचे साहित्य नादुरुस्त झालेले पाहायला मिळते तसेच अनेक उद्यानांमध्ये साहित्यांची मोड तोड आणि स्वच्छतेबाबतच्या तक्रारी या वारंवार आढळून येत आहेत.

नवी मुंबईमधील नेरूळ आणि जुईनगर विभागांमधील उद्यानातील खेळाचे साहित्य नादुरुस्त झालेली आहेत. पालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या या उद्यानांची देखभाल करण्यासाठी ठेकेदारांची नेमणूक करण्यात आलेली आहे, मात्र ठेकेदारांचे दुर्लक्ष झालेले दिसून येत आहे.

उद्यानात अस्वछता तसेच उद्यानातील मुलांसाठीची खेळाची व करमणुकीची साधने तुटलेल्या असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून वेळोवेळी केल्या जातात. सध्या शहरातील शाळा सुरू झाल्या आहेत. शहरातील सर्वच विभागात सकाळी व सायंकाळी बच्चेकंपनीची व पालकांची, ज्येष्ठ नागरिकांची गर्दी पाहायला मिळते, परंतु अनेक उद्यानात कमी जास्त प्रमाणात स्वच्छतेच्या व खेळाच्या साहित्याच्या मोडतोड झाल्यामुळे लहानमुलांसह नागरिक तक्रारी करत आहेत.

जुईनगरमधील कृष्णा शाहीर पाटील उद्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, तसेच नेरूळ सेक्टर विभागातील छत्रपती छाहू महाराज उद्यान, नेरूळ सेक्टर २ मधील छत्रपती संभाजी राजे उद्यान, सेक्टर १२ कै. पंडित रामा भगत उद्यानासह इतर



उद्यानांची खेळणी गायब झाली आहेत तर नेरूळमधील मदर टेरेसा उद्यानातही स्थिती तशीच आहे. इथं असलेल्या पायऱ्या तसेच विविध भाग खराब झाले आहेत.

> नवी मुंबई पालिकेने फक्त स्वछतेवर भर न देता उद्यानांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. लहान मुलांनी खेळाचे कुठे? पालिकेच्या दुर्लक्षामुळे मुलांचा खेळण्यापासून हिरमोड होत आहे.
> –सुनीता औटी, पालक

> शाळा सुरू झाल्या आहेत. काही वेळ विरंगुळा म्हणून मुलांना खेळण्यासाठी उद्यानात घेऊन येतो, मात्र इथे खेळणी गायब, तुटलेल्या अवस्थेमध्ये असतात. त्यामुळे मुलांना खेळण्याच्या साहित्याचा आनंद घेता येत नाही. पालिकेने लक्ष घालून साहित्य दुरुस्त करावे जेणेकरून मुलांना त्याचा आनंद घेता येईल.
> –मनीषा जोगे, पालक

> नवी मुंबईमधील विविध उद्यानातील देखभाल आणि दुरुस्तीचे काम संबंधित ठेकेदार वेळोवेळी करीत असतो. नेरूळ आणि जुईनगर येथील उद्यानातील नादुरुस्त खेळणी व अन्य साहित्याची दुरुस्ती करण्याचे आदेश तत्काळ देतो.
> –दिलीप नेरकर, उपायुक्त, उद्यान विभाग

*नवी मुंबईतील अनेक उद्यानातील खेळणी तुटलेली आहेत. उद्यानात जंगली गवतही मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. पाऊस सुरु झाल्यावर हे गवत आणखी वाढेल. बाजूला मोठा नाला व रेल्वे पटरी असून येथून नाग–साप नेहमीच उद्यानात येत असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.*

# नवी मुंबईत आयुष्मान भारत डिजिटल मिशनचे कामकाज समाधानकारक

## राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मुखर्जींची पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

आयुष्मान भारत डिजीटल मिशनच्या कामकाजाची पाहणी करण्याकरिता राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी दिप्ती गौर मुखर्जी आणि संचालक विक्रम पगारीया यांनी नवी मुंबई महापालिकेच्या वाशी सार्वजनिक रूग्णालयास भेट दिली. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी अतिरिक्त आयुक्त तथा शहर अभियंता शिरीष आरदवाड, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे, रूग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. राजेश म्हात्रे उपस्थित होते.

सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथे आयुष्मान भारत डिजीटल मिशनच्या अंतर्गत आभा ॲपद्वारे रुग्णांची आभा नोंदणी करणे, त्यांचे टोकन नंबर तयार करणे व त्याव्दारे आभा नोंदणी कक्षातून त्वरित केसपेपर मिळविणे अशा कामांबाबतचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. या वेळी महापालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या आरोग्य, पाणी पुरवठा, स्वच्छ भारत मिशन आदी विविध उपक्रमांची सविस्तर माहिती आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी



उपस्थितांना दिली तसेच नजिकच्या काळात रुग्णालयविषयक सर्व कामकाजाचे संगणकीकरण करण्यात येत असल्याचेही नमूद केले.

आभा ॲपद्वारे नोंदणीकरण झालेल्या रुग्णांना लांबलचक रांगा टाळून त्वरित केसपेपर मिळत असल्यामुळे रुग्णांच्या वेळेची बचत होणार आहे. तसेच आभा नंबर हा युनिक असल्यामुळे संपूर्ण देशात आभा पचा वापर होत असलेल्या रुग्णालयांमध्ये रुग्णांची सर्व माहिती जसे की यापूर्वीचा आजार, त्यावर झालेला उपचार, तपासण्या, औषधे अशी सर्व प्रकारची माहिती रुग्णाच्या सहमतीने उपलब्ध असणार आहे. त्यामुळे रुग्णांना चांगल्या व दर्जेदार रुग्णसेवा कमी कालावधीत देता येणे शक्य होणार आहे.

आभा ॲपचा वापर होत असलेल्या खासगी रुग्णालये, प्रयोगशाळा येथेदेखील रुग्णांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी दिप्ती गौर मुखर्जी यांनी सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथे आयुष्यमान भारत डिजीटल मिशनच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त करुन हे कामकाज प्रभावीपणे होत असल्याचे नमूद केले. या योजनेचे पुढील टप्प्यातील कामकाज करणेबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणामार्फत नमुंमपाला याकामी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे सांगितले.

या भेटी दरम्यान कोपरखैरणे येथे जूनी क्षेपणभूमी शास्त्रोक्तरित्या बंद करून त्याठिकाणी बनविण्यात आलेल्या निसर्गोद्यानाला, तेथील मियावाकी जंगल परिसराला तसेच त्या जवळील टाकाऊतून टिकाऊ संकल्पनेतून साकारण्यात आलेल्या आकांक्षी शौचालयाचीही पाहणी करून नवी मुंबई महानगरपालिकेच्या पर्यावरणशील नाविन्यपूर्ण कामांची प्रशंसा केली.

# सानपाड्यात पार्किंगची मोठी समस्या; नियोजनाची मागणी

## एकूण ३५ हजार २६५ वाहनांची नोंद

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई उत्तम नियोजित शहर म्हणून ओळखले जाते. या शहरात गेली काही दशके मोठ्या प्रमाणत विकासकामे मोठ्या प्रमाणात झाली आहे. त्यासोबत शहरात वाढती लोकसंख्या लक्षात घेता लोकसंख्येच्या दृष्टीकोनातून वाहनाचीदेखील संख्या तितक्याच मोठ्या प्रमाणात वाढत आहे. एकट्या सानपाडा विभागात खाजगी दुचाकी व चारचाकी आणि परिवहन मालवाहू वाहने यांची एकूण संख्या ३५ हजार २६५ इतक्या मोठ्या प्रमाणात आहेत. या वाहनांना पार्किंग समस्या भेडसावत आहे.

सिडकोने बांधलेले रस्ते वाढत्या लोकसंख्येनुसार अरुंद वाटू लागले असताना, या अरुंद रस्त्यांवर दुतर्फा पार्किंग केले जात आहे. खाजगी वाहने ३० हजार ५७४ (दुचाकी १७ हजार ०५९ व चारचाकी १३ हजार ५१५) इतकी मोठी संख्या आहे. या सर्व वाहनांना पार्किंगच्या मोठ्या समस्येला रहिवाश्यांना सामोरे जावे लागत आहे. या संदर्भात सानपाडा सेक्टर ४ येथील भूखंड क्रमांक २५/२५अ/२६ या भूखंडावर बहुमजली वाहनतळ उभरण्या संदर्भात मनपा आयुक्त व सिडको व्यवस्थापकीय संचालक यांना सकारात्मक विनंती केली आल्याचे सामाजिक कार्यकर्ते निलेश कचरे यांनी सांगितले. तरी सानपाडा विभागातील नागरिकांच्या, रहिवाश्यांच्या दृष्टीकोनातून चांगल्या सेवा सुविधा देण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. येत्या काळात वाशी, बेलापुर नेरूळ प्रमाणे सानपाडा विभागदेखील विकास दृष्टिक्षेपात असणार असून, मूलभूत सुविधांकडे लक्ष व प्राधान्याने लक्ष द्यावे. रहिवाशी भागासोबत सानपाडा विभागात रुग्णालयांची तसेच शाळांची संख्यादेखील जास्त आहे. रूग्णालयात सानपाडा बाहेरून देखील नागरीक येत असतात तसेच शाळेत येणारे पालक देखील वाहने घेऊन येत असतात. शिक्षक स्वतःची वाहने घेऊन येत असतात. त्या वाहनांची भर विभागात पडत आहेत. सध्या घरटी दुचाकी तसेच चारचाकी वाहनांची भर पडू लागली असताना त्याचा ताण शहरावर पडू लागला आहे.

सानपाडा विभागात रायन शाळा आहे. या शाळेच्या परिसरात पार्किंग व नो पार्किंगचे फलक लावलेले आहेत, मात्र येथील रहिवाशी नो पार्किंगमध्ये वाहने बिनदिक्कत उभी करून जातात. अनेकदा अरुंद रस्त्यावर दुतर्फा पार्किंग केलेली वाहने, शाळेच्या वाहनांना अडचणीची ठरत आहेत. शाळेच्या बसेस या दुतर्फा वाहनांच्या बाजूला उभ्या केल्या जात, असून स्वतःचे वाहन घेऊन येणाऱ्या पालकांची त्यात भर पडत आहे. त्यामुळे रायन शाळा परिसरात वाहतूककोंडीला सामोरे जावे लागत आहे. नो पार्किंग मध्ये महिनो न महिने उभ्या केलेल्या वाहनांवार वाहतूक विभागाने कारवाई करून शलेसमोरील एक लेन रिकामी करावी, अशी मागणी संतप्त पालक करत आहेत.

# शाईची नोंद काव्यसंग्रहाला पुरस्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

कवी व महाराष्ट्र पोलीस दलात नवी मुंबई क्राईम ब्रँच स्थित कार्यरत असलेले उत्तम तरकसे यांच्या शाईची नोंद या काव्यसंग्रहाला पहिला पुरस्कार जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ नागपूर यांचा उत्कृष्ट वांग्मय २०२४चा पुरस्कार मिळाला.

मराठी साहित्यातील विविध प्रकारच्या दर्जेदार व उत्कृष्ट साहित्य निर्मिती व्हावी म्हणून कोल्हापूर जिल्ह्यातील महागाव येथील बहुउद्देशीय सामाजिक संस्थेकडून दरवर्षी उत्कृष्ट साहित्या करिता पुरस्कार दिले जातात. हे पुरस्कार साहित्य क्षेत्रात अत्यंत मानाचा व प्रतिष्ठेचा मानला जाणारा २०२४ सालाचा उत्कृष्ट साहित्यरत्न पुरस्कार उत्तम तरकसे यांच्या शाहीची नोंद या काव्यसंग्रहाला मिळाल्याचे प्रा. रसूल सोलापुरे यांनी कळवले.

प्रा. रसूल सोलापुरे व त्यांच्या संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच परीक्षण करणाऱ्या परीक्षकांनी शाईची नोंद या काव्यसंग्रहाचा पुरस्काराकरिता निवड केल्याबद्दल सर्वांचे मनापासून आभार मानले आहेत. उत्तम तरकसे यांच्या काव्यसंग्रहाला पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून त्यांच्यावरती अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यामुळे त्यांनी सर्वांचेच खूप खूप मनापासून आभार मानले आहेत शानदार कार्यक्रमात पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# सुदृढ आरोग्यासाठी योगसाधना करणे महत्त्वाचे –आमदार मंदा म्हात्रे

**नवी मुंबई : बातमीदार**

आज देशभरात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जात आहे. याच अनुषंगाने वाशी येथील सिडको एक्झिबिशन हॉल येथे आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून कार्यक्रमाचे सुरुवात बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, दैनंदिन जीवनाच्या धावपळीत शारीरिक व मानसिक आरोग्य राखण्यासाठी नियमित योगासने करणे गरजेचे आहे. योग ही भारताने जगाला दिलेली देणगी आहे. शरीर, मनाच्या उत्तम आरोग्यासाठी योग करणे अत्यंत महत्वाचे आहे. आजच्या धकाधकीच्या आयुष्यात ताणतणाव वाढले आहे. या ताणतणावावर योग हा अत्यंत महत्वाचा उपाय आहे. योग साधनेमुळे असाध्य आजारही बरे होतात. आज राज्यात सर्वदूर योग दिनाचे अनेक कार्यक्रम होत आहेत हे निश्चितच आनंदाची आणि कौतुकाची गोष्ट असल्याचे मत या वेळी व्यक्त केले. तसेच सर्वांना आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



या वेळी न.मुं.म.पा. आयुक्त कैलास शिंदे, शहर अभियंता शिरीष आरडवाड, क्रीडा उपायुक्त अभिलाषा म्हात्रे, सहाय्यक संचालक नगररचना केकाण, प्रजापती ब्रह्मकुमारी शीलादिदी तसेच पोलीस अधिकारी, वाहतूक पोलीस अधिकारी, न.मुं.म.पा. अधिकारी, असंख्य नागरिक उपस्थित होते.

दरम्यान, जागतिक योग दिनानिमित्त नवी मुंबईत मोठ्या प्रमाणात उपक्रम राबविण्यात आले. सर्वच उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाल्याचे चित्र पहावयास मिळाले.

# तडे गेलेल्या उड्डाणपुलाची आयुक्तांकडून पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

तुर्भे सेक्टर २१ येथील नमुंमपा परिवहन आगाराकडून ठाणे बेलापूर रस्त्यावर तुर्भे स्टेशनकडे जाणाऱ्या उड्डाणपुलाचा काही भाग तत्काळ दुरुस्ती करण्याच्या अनुषंगाने सुरक्षिततेसाठी वाहतूक बंद करण्यात आला आहे.

तुर्भे सेक्टर २१ नमुंमपा परिवहन आगाराकडून ठाणे बेलापूर रस्त्यावर तुर्भे स्टेशनकडे जाणाऱ्या उड्डाणपुलाच्या एक स्पॅनमधील साईडचा कॅन्टीलिव्हर भाग सकृतदर्शनी काही प्रमाणात सुटलेल्या अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्या अनुषंगाने संरचना कन्सल्टंट यांचेमार्फत या उड्डाणपुलाच्या या भागाची महापालिकेच्या अभियंत्यांसोबत प्रत्यक्ष स्थळपाहणी करण्यात आली. त्यानुसार संरचना कन्सल्टंट यांचेकडून सदर उड्डाणपूलाच्या स्पॅनचा संरचना व स्थिरता अहवाल प्राप्त करून पुढील अत्यावश्यक दुरुस्ती नमुंमपामार्फत त्वरित



हाती घेण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिले आहेत. या अनुषंगाने आजपासून तुर्भे वाहतूक पोलीस विभागामार्फत उड्डाणपुलावरील ठाणे बेलापूर रस्त्यावर तुर्भे स्टेशनकडे जाणारी वाहतुक सुरक्षिततेच्या दृष्टीने बंद करण्यात आली आहे.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी तातडीने अतिरिक्त आयुक्त तथा शहर अभियंता शिरीष आरदवाड व कार्यकारी अभियंता प्रवीण गाडे यांच्यासह प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून रहदारीची अडचण होऊ नये यादृष्टीने त्याठिकाणी ठाणे बेलापूर मार्गावर वाहतुकीसाठी पर्यायी रस्ता उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत व त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

## निवडक

### प्रभाकर मसुरे यांना भीमरत्न पुरस्कार



**माणगाव** : तालुका बौद्ध समाज समन्वय समितीच्या वतीने तालुका पत्रकार संघाचे सल्लागार तथा ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर मसुरे यांना भीमरत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व बोधीवृक्ष देऊन समन्वय समितीचे अध्यक्ष अ‍ॅड. यशवंत गंगावणे, समाज नेते नरेश अहिरे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. याबद्दल मसुरे यांचे माजी नगराध्यक्ष आनंद यादव, माजी उपनगराध्यक्ष संदीप खरंगटे, रत्नाकर उभारे, दिलीप जाधव, जयंत बोडेरे, पत्रकार संघाचे अध्यक्ष सलीम शेख, ज्येष्ठ पत्रकार मजिद हाजीते, सचिन देसाई, आजेश नाडकर, निलेश म्हात्रे, सल्लागार विजयशेठ मेथा, सुभाष दळवी, अ‍ॅड. केदार गांधी, अ‍ॅड. सदफ येलूकर, अ‍ॅड. भालचंद्र खाडे,स्वप्ना साळुंके, संतोष गायकवाड, देवयानी मोरे आदींनी आभिनंदन केले.

### प्रतीक पेडणेकर यांचा सत्कार

**मुरूड** : तालुक्यामधील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंत नगर नांदगाव हायस्कूलच्या पर्यवेक्षकपदी प्रतीक पेडणेकर यांची नियुक्ती करण्यात आली. याबद्दल श्री काळभैरव पतसंस्थेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. चेअरमन दीपक पालशेतकर यांनी शाल श्रीफळ व पुष्पगुछ देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. या वेळी व्हाईस चेअरमन स्नेहा पाटील, संचालक सुरेश कासेकर, दिपक मयेकर, संचालिका उषा खोत, शाखा व्यवस्थापक रुपाली कारभारी व कर्मचारी उपस्थित होते. पेडणेकर यांनी काळभैरव पतसंस्थेचे विशेष ऋण व्यक्त केले.



# माणगाव उपजिल्हा रुग्णालयाचा रुग्णांना आधार

## सिटीस्कॅन, डायलिसिस सेंटर, रक्तपेढी सेवा सुरू

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील उपजिल्हा रुग्णालयात विविध अत्याधुनिक सुविधा कार्यान्वित झाल्या असून काही प्रमाणात वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचीही भरती करण्यात येत आहे. त्यामुळे तालुक्यातसह आजूबाजूच्या गावातील ग्रामस्थांना दिलासा मिळाला आहे.

हे उपजिल्हा रुग्णालय १०० खाटांचे आहे. या रुग्णालयात दररोज ३०० ते ४०० रुग्ण आरोग्य तपासणीसाठी येत असतात, मात्र वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि आरोग्य सुविधा नसल्याने रुग्णांचे हाल होत होते. आता मात्र पुरेशा सुविधा उपलब्ध झाल्याने समाधान व्यक्त केले जात आहे. त्यामुळे रुग्णांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे सहाय्यक अधीक्षक अविनाश साळवी यांनी सांगितले.

या रुग्णालयात सिटीस्कॅन मशीन सुरू करण्यात आली आहे. रुग्णालयातील डायलिसिस सेंटर सुरू झाले असून चार



खाटा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्यासाठी पुरेसा कर्मचारी तैनात करण्यात आला आहे. सध्या किडनी रुग्णांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अनेक रुग्णांना जीवदान मिळत आहे.

रुग्णालयात नव्याने रक्तपेढी सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे आता गरजू रुग्णांना कोणत्याही परिस्थितीत तातडीने खासगी रक्त संकलन रक्त प्रयोगशाळेत जावे लागणार नाही. येथे रक्तपिशव्या मोफत उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. याचबरोबर या उपजिल्हा रुग्णालयात जलशुद्धीकरण केंद्र सुरू करण्यात आले असून रुग्णांना शुद्ध आणि स्वच्छ पाणी रुग्णांना मिळणार आहे.

कोरोना महामारी काळात मोठ्या क्षमतेचे ऑक्सिजन प्लांट कार्यान्वित करण्यात आला होता. त्याचा लाभ रायगड जिल्हा आणि रत्नागिरी जिल्ह्यातील जवळच्या तालुक्यातील रुग्णांना होत आहे. अतिदक्षता विभागात उपचार करण्यासाठी याचा उपयोग होत असून अनेकांचे श्वास मोकळे होत असून त्यांना पुन्हा जीवन मिळत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेली जनआरोग्य योजना येथे सुरू असून किमान पाच लाखांपर्यंत रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध केल्याने आतापर्यंत हजारो नागरिकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. त्यामुळे लाखो रुपयांची बचत झाली आहे.

येथे काही महत्त्वाच्या शस्त्रक्रिया केल्या जात आहेत. लवकरच आवश्यक असलेले वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी भरती केले जाणार आहेत. त्यामुळे या सर्व आरोग्य सेवांचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन सहाय्यक अधीक्षक अविनाश साळवी यांनी केले आहे.

# श्रीवर्धन जावेळे पुलाच्या कामाची मंत्री आदिती तटकरेंकडून पाहणी



**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील गालसुरे-आडी-महाड खाडी रस्त्यावरील या नव्याने बांधण्यात आलेल्या जावेळे पुलाच्या कामाची पाहणी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी रविवारी (दि.२३) केली. या वेळी संबंधित अधिकारी, ग्रामस्थ, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

तालुक्यातील गालसुरे-आडी हा पूल वडशेत वावे, साखरोने, धारवली, आडी, जावेळे, साखरी, कोंढे पंचतन या सात गावांचा दुवा आहे. या पुलामुळे या गावांतील राहणारे सुमारे साडेतीन हजार ग्रामस्थ इतर भागाशी जोडले जाणार आहेत. या ठिकाणी जुन्या पुलाची मोठी दूरवस्था झाली होती. त्यामुळे ग्रामस्थांची होणारी गैरसोय दूर होण्यासाठी या ठिकाणी नवीन पूल उभारण्यात आला आहे. या नव्याने उभारण्यात आलेल्या पुलाचे काम पूर्ण होऊन येथील नागरिकांची मोठी समस्या दूर झाली याचा मनस्वी आनंद होत असल्याचे या वेळी ना. आदिती तटकरे यांनी सांगितले.

# चौक बाजारपेठेतील बंद घर कोसळले, सरपंचांकडून पाहणी

**चौक : प्रतिनिधी**

चौक बाजारपेठेमधील एक जुने घर रविवारी (दि.२३) पहाटे कोसळले. सुदैवाने हे घर बंद असल्याने जीवितहानी झाली नाही.



खालापूर तालुक्यात चौक ही ऐतिहासिक बाजारपेठ आहे. आजूबाजूच्या ४० गावातील लोक या ठिकाणी खरेदी-विक्री करण्यास येतात. चौक बाजारपेठ मध्य काही घरांची वयोमर्यादा १०० वर्षांपेक्षा जास्त आहे. काही घरे आजही सुस्थितीत आहेत, तर काही घरे गेली अनेक वर्षे बंद आहेत. या बंद घरांची देखभाल दुरूस्ती होत नाही, कधीही मालक येऊन घरांची पडझड झालेली बघत नाहीत की, देखभाल दुरूस्ती करीत नाहीत. याचा धोका शेजारी राहणाऱ्या लोकांना जास्त होत आहे. याबाबत स्थानिक प्रशासनाकडे तक्रार करूनही त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप परिसरातील रहिवाशांकडून आरोप होत आहे.

या इमारतीचा भाग कोसळल्यानंतर पंकज शहा यांनी भ्रमणध्वनीवरून माहिती दिली. त्यानंतर सरपंच रितू ठोंबरे यांनी पाहणी केली. त्यांनी कर्मचाऱ्यांना रस्त्यावर पडलेला मलाबा हटविण्याचे आदेश दिले. चौक बाजारपेठेमधील धोकादायक इमारती व घरांचे सर्वेक्षण करण्यात येईल, असे ग्रामविस्तार अधिकारी एस. पी. जाधव यांनी सांगितले.

# माथेरानमध्ये नवीन एटीएम सुरू; पर्यटकांना दिलासा



**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये रविवारी (दि.२३) माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेतर्फ वर्धापन दिनानिमित्त स्वतःचे एटीएम सुरू केले आहे. यामुळे पर्यटकांसह स्थानिकांचीही गैरसोय दूर होणार आहे.

पहिल्याच दिवशी अनेक पर्यटकांनी एटीएममधून पैसे काढण्यासाठी रांगा लावल्या होत्या.

स्वातंत्र्यवीर भाई कोतवाल यांनी स्थापन केलेल्या या पतसंस्थेने रविवारी आपला ८५वा वर्धापन दिन सोहळा सादर केला. त्यानिमित्ताने पतसंस्थेच्या कार्यालयांमध्ये सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले होते.



**मुरूड : खासदार सुनील तटकरे मोठ्या मताधिक्क्याने निवडून आल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी नगरसेवक मनोज भगत यांनी केला. खासदार तटकरे यांच्यासमवेत आमदार महेंद्र दळवी यांचा सत्कार माजी सरपंच अजित कासार यांनी केला. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अतिक खतीब, माजी जि.प. सदस्य नम्रता कासार, प्रीता चौलकर, रिया मयेकर आदी उपस्थित होते.** (छाया : संजय करडे)

# मुरूड ताराबंदर येथे टँकरने पाणीपुरवठा

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील बोर्ली ग्रामपंचायत हद्दीमधील ताराबंदर गावात भीषण पाणीटंचाई उद्‌भवली आहे. ग्रामस्थांना खूप दूरवरून पाणी आणावे लागत होते. भाजपचे दक्षिण रायगडचे उपाध्यक्ष दिलीप भोईर यांनी ग्रामस्थांना दिलासा मिळावा यासाठी तातडीने पाण्याचे टँकर जलद गतीने उपलब्ध करून दिला आहे.

ताराबंदर गावात भीषण पाणीटंचाई उद्‌भवली आहे. यंदा पाऊस उशिरा सुरू झाल्याने फणसाड धरणातील पाणीसुद्धा आटले आहे. ताराबंदर गावाची पाण्याची वणवण बघून उपाध्यक्ष दिलीप भोईर आणि नील फाउंडेशन यांच्या मदतीने तत्काळ पाण्याचा टँकर देण्यात आला आहे. ताराबंदर हे गाव अनेक वर्षे पाणीटंचाईपासून झगडावे लागत आहे. ग्रामपंचायतीसुद्धा या गावातील पाणीटंचाई दूर करू शकली नाही.

मुरूड तालुका भाजपचे उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण यांनीसुद्धा मेहनत घेत पाण्याचा टँकर तातडीने शोधून स्वतः पाणी वितरित केले. याबद्दल ग्रामस्थांनी भाजपचे उपाध्यक्ष दिलीप भोईर व स्वप्नील चव्हाण यांचे आभार व्यक्त केले आहेत.



# रायगडात आले चवदार मुठ्यांचे दिवस

## पकडण्यासाठी तरुणांची लगबग; खवय्यांची पसंती


**पाली : प्रतिनिधी**

पाली सुधागडसह रायगड जिल्ह्यात पावसाला काही दिवसांपूर्वी सुरुवात झाली आहे. पावसाच्या सुरुवातीला मिळणाऱ्या मुठ्यांचे आगमन झाले आहे. त्यामुळे खवय्ये आनंदी आहेत. आरोग्यवर्धक, चविष्ट व लज्जतदार मुठ्यांना खवय्यांची पसंती असते. गावागावात रात्री अनेकजण मुठे पकडण्याची मज्जा लुटताना दिसत आहेत.

पावसाच्या सरींमुळे माळरान, शेत, डोंगर उतारावर जमीन ओली झाली आहे. गवताची कोवळी पाती डोलू लागली आणि कोवळ्या गवतावर गुजराण करणारे व पावसाच्या सुरुवातीलाच बाहेर पडणारे मुठे बिळातून बाहेर आलेले पहायला मिळत आहेत. सध्या चिकन, मटणाचे दरदेखील वधारले आहेत. अशा वेळी फक्त पावसाळ्यात बाहेर पडणारे मुठे खवय्यांना मेजवानी ठरतात.

रात्रीच्या वेळी रिमझिम पाऊस पडू लागल्यावर लोक मुठे पकडण्यासाठी बाहेर पडतात. हातात गॅसबत्ती, टॉर्च किंवा जळता टायर घेतला जातो. सोबत मुठे ठेवण्यासाठी सिमेंटची पोती, गोणपाट किंवा प्लास्टिकचा छोटा पिंप किंवा बादली असतो. रात्रभर माळराण, शेत, गवताळ भाग किंवा डोगर उतारावर फिरून मुठे पकडले जातात. बत्तीच्या किंवा टॉर्चच्या उजेडात हे मुठे थांबतात मग दबक्या पावलांनी जावून त्यांना पकडून पोत्यात टाकले जाते. बऱ्याच वेळ फिरूनसुद्धा काही वेळा मुठे हाती लागत नाही. त्यासाठी निसर्गाची साथ व योग्य परिस्थिती असावी लागते.

आकाराने लहान असले तरी मुठ्यांचे मांस चविष्ट व आरोग्यवर्धक असते. मुठे वेगवेगळ्या प्रकारे आणि पद्धतीने बनवून खाल्ले जातात. मुठ्यांचे कवच काढून त्यामध्ये मूग, तांदूळ किंवा चण्याच्या पिठाचे मिश्रण भरले जाते. हे मिश्रण भरल्यावर धाग्याने पुन्हा कवच बांधून कालवण तयार केले जाते. आतील गराबरोबरच हे भरलेले मिश्रण चविष्ट आणि लज्जतदार लागते.



### इथे आढळतात मुठे...

*पहिल्या पावसानंतर आलेले कोवळे गवत खाण्यासाठी मुठे बिळातून बाहेर पडतात. माळरान, शेत, डोंगर, ओहोळ, नदी आणि खाडीच्या किनारी मुठे सापडतात. रात्रीच्या वेळीच रिमझिम पावसात हे मुठे गवत खाण्यासाठी बाहेर पडतात. कोवळे गवत आपल्या नांग्यांनी तोडून बिळात नेऊन निवांत खातात.*

**सध्या मुठे मोठ्या प्रमाणात बाहेर पडत आहेत. दोन दिवसांपूर्वी मित्रपरिवारासह मोठ्या प्रमाणात मुठे पकडून आणले. दरवर्षी मुठे खाण्यासाठी पावसाची वाट पाहत असतो. खवय्यांना नेहमीच त्यांचे आकर्षण असते. मुठे पकडतानाची मज्जा काही औरच आहे. मित्रापरिवारालादेखील मुठे भेट देतो.**
**-राहुल कांबळे, पोलीस पाटील, कानसळ, सुधागड**

# चौल हिंगुळजा देवी मंदिर पायथ्याशी वृक्षारोपण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल हिंगुळजा देवी मंदिराच्या पायथ्याशी वृक्षारोपण कार्यक्रम रविवारी (दि.२३) उत्साहात झाला.

सालाबादप्रमाणे निसर्ग प्रेमी संस्था, दिलसे ग्रुप भगवती, ओयासिस एनजीओ, चौल कृषक कल्याणकारी संस्था, यांचे संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रम चौल हिंगुळजा देवी पायथ्याशी घेण्यात आला. या वृक्षारोपण कार्यक्रमात ६५ सदस्यांनी श्रमदान करून चौल हिंगुळजा देवीच्या पायथ्याशी वृक्षारोपण केले. या वेळी वनपाल एम. डी. तायडे यांचे मार्गदर्शन लाभले. यावर्षी दिलसे ग्रुप भगवती, ओयासिस एनजीओ, चौल कृषक कल्याणकारी संस्था यांनी विशेष सहकार्य दिले. चौल हिंगुळजा देवीच्या पायथ्याशी डोंगर टेकडीवर साफसफाई करून ठिकठिकाणी खड्डे मारण्यात आले.

या वेळी एकूण ४०० वृक्षांची लागवड करण्यात आली. यामध्ये अंबा,काजू, आवळा, सिसवं, करंज, खैर, जांभुळ, भावाहा आदी वृक्ष रोपटयाचा समावेश होता, असे निसर्गप्रेमी संस्थेचे संस्थापक राकेश काठे यांनी म्हटले.



# टी-२० वर्ल्डकपमध्ये मोठा उलटफेर

## अफगाणिस्तानचा ऑस्ट्रेलियावर ऐतिहासिक विजय

**किंग्सटाउन : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तान संघाने टी-२० विश्वचषकात ऑस्ट्रेलियावर मात करीत त्यांचा आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच पराभव केला आहे. गेल्या वर्षी झालेल्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत अफगाणिस्तान विजयाच्या उंबरठ्यावर पोहचला होता, पण मॅक्सवेलने त्याच्याकडून विजय हिसकावून घेतला. या वेळी मात्र त्यांनी अशी कोणतीही चूक केली नाही आणि किंग्सटाउन येथे झालेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा २१ धावांनी पराभव केला. या अफगाणिस्तानच्या विजयाचा खरा शिल्पकार गुलबदीन नईब ठरला.



दोन्ही संघांमध्ये एकदिवसीय आणि दोन टी-२० सामने खेळले गेले आहेत. एकदिवसीय सामन्यात अफगाणिस्तानचा संघ ऑस्ट्रेलियाविरुद्ध कधीही जिंकू शकला नाही, मात्र टी-२०च्या दुसऱ्या सामन्यात अफगाणिस्तानने ऑस्ट्रेलियाला हरवून इतिहास रचला. नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानने २० षटकांत सहा गडी गमावून १४८ धावा केल्या होत्या. रहमानउल्ला गुरबाजने ६० आणि इब्राहिम झाद्रानने ५१ धावा केल्या. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियन संघ १९.२. षटकांत १२७ धावांवर गारद झाला.

ग्लेन मॅक्सवेल (५९) व्यतिरिक्त कोणत्याही खेळाडूला १५चा आकडादेखील गाठता आला नाही. ट्रॅव्हिस हेड (०), डेव्हिड वॉर्नर (३), कर्णधार मिचेल मार्श (१२), मार्कस स्टॉइनिस (११), टीम डेव्हिड (२), मॅथ्यू वेड (५), पॅट कमिन्स (३), श्टन अगर (२) आणि अॅडम झम्पा (९) विशेष काही करू शकला नाही. या सामन्यात एकेकाळी ऑस्ट्रेलियाने ३२ धावांवर तीन विकेट गमावल्या होत्या. त्यानंतर ग्लेन मॅक्सवेलने मार्कस स्टॉइनिससोबत ३९ धावांची भागीदारी केली. अफगाणिस्तानकडून गुलबदिन नईबने सर्वाधिक चार विकेट घेतल्या.

तत्पूर्वी नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानने २० षटकांत सहा गडी गमावून १४८ धावा केल्या. एकवेळ अफगाणिस्तान संघाने एकही विकेट न गमावता ११८ धावा केल्या होत्या, मात्र त्यानंतर ३० धावा करताना संघाने सहा विकेट गमावल्या. ऑस्ट्रेलियाच्या पॅट कमिन्सने सलग दुसऱ्या सामन्यात हॅट्ट्रिक घेत इतिहास रचला. याआधी कमिन्सने बांगलादेशविरुद्ध हॅट्ट्रिक घेतली होती.

### मॅक्सवेलची विकेट टर्निंग पॉइंट

या सामन्यात जोपर्यंत ग्लेन मॅक्सवेल खेळपट्टीवर ठाण मांडून होता, तोपर्यंत अफगाणिस्तान संघ विजय मिळवू शकेल असे कोणालाच वाटत नव्हते, मात्र ऑस्ट्रेलियाला १५व्या षटकात १०६ धावांवर सहावा धक्का ग्लेन मॅक्सवेलच्या रूपाने मोठा धक्का बसला. गुलबदिन नईबने त्याला नूर अहमदकरवी झेलबाद केले. मॅक्सवेल ४१ चेंडूत ५९ धावा करून बाद झाला. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

# भारत सेमी फायनलच्या दिशेने

## सुपर ८च्या दुसऱ्या सामन्यात बांगलादेशवर मात

**अँटिग्वा : वृत्तसंस्था**




भारतीय संघाने ट्वेटी-२० वर्ल्डकप स्पर्धेच्या उपांत्य फेरीच्या दिशेने दमदार पाऊल टाकले आहे. सुपर ८ फेरीत भारताने बांगलादेशला हरविले. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना रोहितसेनेने २० षटकांत पाच बाद १९६ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात बांगलादेशने २० षटकांत ८ बाद १४६ धावा केल्या. सलग दोन विजय मिळवून भारत चार गुणांसह ग्रुप १मध्ये अव्वल स्थानी पोहचला आहे.

बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात रोहित शर्मा (२३) आणि विराट कोहली (३७) पुन्हा एकदा मोठी खेळी करण्यापासून वंचित राहिले. रिषभ पंतने (३६) फॉर्म कायम राखला, परंतु चुकीच्या फटक्याने पुन्हा त्याचा घात केला. सूर्यकुमार यादव (६) अपयशी ठरला असला तरी शिवम दुबेला (३४) गवसलेला सूर दिलासा देणारा ठरला. हार्दिक पांड्या व दुबे यांनी ३४ चेंडूत ५३ धावांची भागीदारी केली. हार्दिकने २७ चेंडूत चार चौकार व तीन षटकारांसह नाबाद ५० धावा केल्या आणि भारताला ५ बाद १९६ धावांपर्यंत पोहचवले. ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत सर्वाधिक ११ वेळा १८०पेक्षा अधिक धावा करण्याचा पराक्रम भारताने नावावर केला आणि इंग्लंडला (१०) मागे टाकले.

फलंदाजीत कमाल केल्यानंतर हार्दिकने बांगलादेशचा सलामीवीर लिटन दास (१३) याला माघारी पाठवले. सूर्यकुमार यादवने अप्रतिम झेल घेतला. त्यानंतर कुलदीप यादवने बांगलादेशचा सेट फलंदाज तनझिद हसनला (२९) बाद केले. बांगलादेशने १० षटकांत दोन बाद ६७ धावा केल्या होत्या आणि त्यांना शेवटच्या १० षटकांत १३० धावा करायच्या होत्या. कुलदीपने आणखी दोन धक्के देताना तौवहिद हृदय (४) आणि शाकिब अल हसन (११) यांना माघारी पाठवले. कुलदीपने चार षटकांत १९ धावा देताना तीन विकेट घेतल्या. कुलदीपच्या स्पेलने बांगलादेशच्या हातून सामना निसटला आणि त्यांना शेवटच्या पाच षटकांत ८९ धावा हव्या होत्या.

रोहितने प्रमुख गोलंदाज जसप्रीत बुमराह याला पुन्हा आणले आणि त्याने नजमुल होसैन शांतो (४०) याला बाद करून बांगलादेशची अवस्था ५ बाद १०९ अशी केली. अर्शदीप सिंगने १७व्या षटकात जाकेर अलीला (१) बाद केले. बुमराहने पुन्हा एकदा अप्रतिम स्पेल टाकून विजयात महत्त्वाची भूमिका वटवली. त्याने चार षटकांत १३ धावा देत दोन विकेट घेतल्या. अर्शदीपनेही दोन विकेट्स घेतल्या.

# हॅट्ट्रिकवीर कमिन्सने लावली विक्रमांची रांग



**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचा स्टार वेगवान गोलंदाज पॅट कमिन्सने अफगाणिस्तानविरुद्ध टी-२० विश्वचषक स्पर्धेतील सुपर ८ सामन्यात इतिहास रचला आहे. कमिन्स हा टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात दोन हॅट्ट्रिक घेणारा जगातील पहिला गोलंदाज ठरला आहे. विशेष म्हणजे त्याने सलग दोन सामन्यात हा पराक्रम केला आहे.

पॅट कमिन्सने रविवारी अफगाणिस्तानविरुद्ध झालेल्या सामन्यात रशीद खान (२), करीम जनात (१३) आणि गुलबदिन नईब (०) यांना बाद करून यंदाच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेतील आपली दुसरी हॅट्ट्रिक पूर्ण केली. पॅट कमिन्सने १८व्या षटकाच्या सहाव्या चेंडूवर दोन धावांच्या वैयक्तिक धावसंख्येवर रशीद खानला बाद केले. यानंतर २०व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर करीम जनातला (१३) बाद केले. त्यानंतर पुढच्याच चेंडूवर गुलबदीन नईबला (०) पॅव्हेलियनमध्ये माघारी पाठवले.

टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात पॅट कमिन्स हा दोन हॅट्ट्रिक घेणारा जगातील पहिला गोलंदाज आहे. याशिवाय तो टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अशी कामगिरी करणारा जगातील पाचवा गोलंदाज आहे. पुरुषांच्या टी-२० वर्ल्डकपमध्ये हॅट्ट्रिक घेणारा कमिन्स जगातील सातवा गोलंदाज आहे, तर तो टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सलग तीन गडी बाद करणारा चौथा ऑस्ट्रेलियन गोलंदाज आहे, मात्र कमिन्सची ही हॅट्ट्रिक ऑस्ट्रेलियासाठी व्यर्थ ठरली, कारण अफगाणिस्तान संघाने सुपर ८ सामन्यात ऑस्ट्रेलियाचा पराभव करीत मोठा धक्का दिला.

दरम्यान, अफगाणिस्तानच्या या विजयामुळे सुपर ८ गट १मधील उपांत्य फेरी गाठण्याची लढाई रोमांचक झाली आहे. आता ऑस्ट्रेलिया आणि अफगाणिस्तान या दोघांचे प्रत्येकी दोन गुण झाले आहेत. ऑस्ट्रेलियाला आपला शेवटचा सुपर ८ सामना भारताविरुद्ध खेळायचा आहे, तर अफगाणिस्तानला बांगलादेशविरुद्ध खेळायचे आहे. दोन्ही संघांना विजय आवश्यक आहे. दोघेही हरले तर नेट रन रेटचा खेळ रंगेल.

# नेदरलँड्स-फ्रान्स यांच्यात गोलशून्य बरोबरी; सामन्याला वादाचे गालबोट

**लॅपझिग : वृत्तसंस्था**



गोल करण्याच्या संधी दोन्ही संघांकडून गमाविण्यात आल्यानंतर युरो फुटबॉल स्पर्धेत फ्रान्स आणि नेदरलँड्स यांच्यातील सामन्याला उत्तरार्धात नेदरलँड्सला नाकारण्यात आलेल्या गोलमुळे निर्माण झालेल्या वादाचे गालबोट लागले. दुखापतीचे गांभीर्य लक्षात घेत आणि योग्य मास्कच्या अनुपलब्धतेमुळे अखेर फ्रान्सने कर्णधार किलियन एम्बापेला या सामन्यात विश्रांती देण्याचा निर्णय घेतला.

एम्बापेच्या गैरहजेरीत अँन्टोनी ग्रीझमनने नेतृत्व केले. ग्रीझमनला दोन्ही सत्रात गोल करण्याच्या एकेक संधी मिळाल्या होता, पण त्यावर गोल करण्यात ग्रीझमनला अपयश आले. दोन्ही संघ विजयासाठी आटोकाट प्रयत्न करत असताना नेदरलँड्सच्या झावी सिमोन्सने सामन्याच्या ६९व्या मिनिटाला गोलशून्य बरोबरीची कोंडी फोडली. सामन्यात आघाडी घेतल्याचा आनंद सिमोन्सच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता, पण पंचांनी फ्रान्स गोलरक्षकाजवळीत नेदरलँड्सचा खेळाडू डुमफ्रीस 'ऑफसाइड' असल्याचा निर्णय दिला. तोवर जल्लोषात असलेले मैदानावरील वातावरण एकदम सुन्न झाले. नेदरलँड्सचा प्रत्येक खेळाडू पंचांशी वाद घालत होता. तेव्हा गोलची वैधता ठरविण्यासाठी 'वार' प्रणालीकडे निर्णय सोपविण्यात आला. तिसऱ्या पंचांनी निर्णयासाठी जवळपास पाच मिनिटांचा अवधी घेत गोल अपात्रतेवर शिक्कामोर्तब केले. हा वादग्रस्त प्रसंग वगळता संपूर्ण सामन्यात दोन्ही संघांकडून तगड्या बचावाचे प्रदर्शन झाले.

फ्रान्स आणि नेदरलँड्स दोघांचेही आता दोन सामन्यांतून चार गुण झाले आहेत. ऑस्ट्रियाचे तीन गुण आहेत. पोलंडची पाटी कोरी आहे. सलग दुसऱ्या पराभवाने त्यांचे आव्हान संपुष्टात आले आहे. आता फ्रान्सचा अखेरचा सामना पोलंड, तर नेदरलँड्सचा सामना ऑस्ट्रियाशी होणार आहे.

### गोल नाकारणे पंचांची चूकच -कोव्हमन

नेदरलँड्सचा गोल नाकारण्याचे पडसाद सामन्यानंतरही उमटले. सामना संपल्यावर नेदरलँड्सच्या खेळाडूंनी पंचांशी बोलताना नाराजी बोलून दाखवली. नेदरलँड्सचे प्रशिक्षक रोनाल्ड कोव्हमनही भडकले होते. गोलरक्षकाजवळील डुमफ्रीस 'ऑफसाइड' होता, पण तो गोलरक्षकाला विचलित करत नव्हता. जेव्हा असा प्रसंग येतो तेव्हा तो गोल ग्राह्य धरला जातो. हा निर्णय कठीण होता. म्हणूनच गोलची ग्राह्यता ठरवताना पाच मिनिटे गेली. त्यांचा निर्णयच कळत नाही. हा गोल नाकारणे ही पंच अन्थोनी टेलर यांची चूकच होती, असे कोव्हमन म्हणाले.



# आम्ही बॅट, बॉलसह चांगली कामगिरी केली -रोहित शर्मा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या सुपर ८ फेरीतील सलग दुसरा सामना भारताने जिंकला आहे. भारताने अँटिगामध्ये झालेल्या सामन्यात बांगलादेशविरुद्ध ५० धावांनी मोठा विजय मिळवला. या सहज मिळवलेल्या विजयावर कर्णधार रोहित शर्माने प्रतिक्रिया दिली आहे.

रोहित शर्मासह भारताच्या सर्वच फलंदाजांनी आक्रमक फलंदाजी केली. याबद्दल बोलताना रोहित म्हणाला, मी बऱ्याच दिवसांपासून बॅटने आक्रमक खेळण्याबद्दल बोलत आहे. सर्व गोष्टींचा विचार करता आम्ही परिस्थितीशी जुळवून घेत खरोखरच चांगले खेळलो. इथे वाऱ्याचा थोडासा प्रभाव आहे, पण आम्ही खूप हुशारीने खेळत आहोत. एकूणच आम्ही बॅट आणि बॉलसह चांगली कामगिरी केली.

यासह टीम इंडियाच्या बॅटिंग ऑर्डरवर रोहित शर्मा म्हणाला, आठही फलंदाजांना त्यांची भूमिका चोख पार पाडायची आहे, मग काहीही होवो. आम्ही पाहिले की एका खेळाडूने ५० धावा केल्या आणि आम्ही १९६ धावा केल्या. माझ्या मते तरी टी-२०मध्ये अर्धशतके आणि शतके झळकावण्याची गरज नाही. तुम्ही गोलंदाजांवर किती दबाव टाकता हे महत्त्वाचे आहे. सर्व फलंदाज सुरुवातीपासून असेच खेळत आले आहेत आणि आम्हालाही असेच खेळत राहायचे आहे. संघात खूप अनुभवी खेळाडू आहेत आणि संघ त्यांना पाठिंबा देतो.

हार्दिक पंड्याबद्दल बोलताना रोहित शर्मा म्हणाला, गेल्या सामन्यातही मी म्हणालो की, त्याच्या चांगल्या फलंदाजीने संघाला चांगल्या स्थितीत आणले आहे. टॉप पाच, सहा फलंदाजांनंतर सामन्याला एक चांगला फिनिश देण्याची गरज आहे, हार्दिक हा हार्दिक आहे, आम्हाला माहित आहे की तो काय करण्यास सक्षम आहे. तो संघासाठी खूप महत्त्वाचा खेळाडू आहे, तो अशीच कामगिरी करीत राहिल आणि संघाला एका चांगली धावसंख्या गाठण्यात मदत करेल.

# अफगाणिस्तानच्या विजयात प्रशिक्षकांचेही महत्त्वाचे योगदान

**किंग्सटाउन : वृत्तसंस्था**

वर्ल्डकप स्पर्धेत ऑस्ट्रेलियाचा संघ वेगळ्याच ईर्ष्येने खेळतो. त्यांना हरवणे कठीण मानले जाते, मात्र अफगाणिस्तानने टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत ऑस्ट्रेलियाला नमवण्याची किमया केली. या विजयाचे श्रेय जेवढे अफगाणिस्तानच्या खेळाडूंना जाते तेवढेच पडद्यामागच्या दोन नायकांना जाते ते म्हणजे अफगाणिस्तानचे मुख्य प्रशिक्षक जोनाथन ट्रॉट आणि गोलंदाजी प्रशिक्षक ड्वेन ब्राव्हो.

ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यातील हाडवैर क्रिकेटचाहते जाणतातच. जोनाथन ट्रॉट खेळत असताना ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंविरुद्ध झालेली बाचाबाची चर्चेत राहिली होती. त्याच ट्रॉटने अफगाणिस्तानच्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या ऐतिहासिक विजयासाठी डावपेच आखले. ट्रॉटला साथ मिळाली ड्वेन ब्राव्होची.

किंग्सटाऊनच्या खेळपट्टीवर फलंदाजी करणे सोपे नाही याची जाणीव अफगाणिस्तानच्या संघाला होती. ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. शिस्तबद्ध मारा करीत ऑस्ट्रेलियाने अफगाणिस्तानला १४८ धावांचीच मजल मारू दिली. ऑस्ट्रेलियाचे आक्रमण दर्जेदार असले तरी विकेट्स फेकू नका. खेळपट्टीवर स्थिरावण्याचा प्रयत्न करा, छोट्या पण उपयुक्त खेळी करा. दीडशे धावा पुरेशा ठरू शकतात हा ट्रॉट यांचा सल्ला अफगाणिस्तानच्या खेळाडूंनी मानला. रहमनुल्ला गुरबाझ आणि इब्राहिम झाद्रान यांनी ११८ धावांची खणखणीत सलामी दिली. या सलामीनंतर अफगाणिस्तानची घसरण उडाली, पण त्यांचा ऑलआऊट झाला नाही. करीम जनतने १३, तर मोहम्मद नबीने १० धावा करीत धावफलक हलता ठेवला.

लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संघ जोरदार आक्रमण करतो हे ट्रॉट यांना पक्के ठाऊक होते, पण असे करताना विकेट्स पटकावण्याची शक्यता जास्त असते. त्यानुसार अफगाणिस्तानने



ऑस्ट्रेलियाची अवस्था ३२/३ अशी केली. टी-२० क्रिकेटमध्ये फलंदाज जोरदार फटकेबाजी करीत असताना शांत राहून गोलंदाजी कशी करावी याचा वस्तुपाठ म्हणजे ड्वेन ब्राव्हो. जगभरात टी-२० लीग खेळण्याचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या ब्राव्होने अफगाणिस्तानच्या गोलंदाजांना नक्की कोणत्या टप्प्यावर गोलंदाजी करा याचा मंत्र दिला.

ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंना वेगात येणारा चेंडू ही अडचण नाही, उलट ते याचा फायदा उठवतात. म्हणूनच वाईड यॉर्कर, स्लोअरवन, कटर यावर अफगाणिस्तानच्या खेळाडूंनी भर दिला. ऑस्ट्रेलियाने एकदा पवित्रा बदलला की त्यांना रोखणे अवघड होऊ शकते. त्यामुळे अफगाणिस्तानने स्वैर मारा टाळला. मोहम्मद नबी, रशीद खान, नूर अहमद यांचे चेंडू कसे वळतात याचा कोणताही अंदाज ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंना येत नव्हता. रशीदला खेळणे ऑस्ट्रेलियाला नेहमीच कठीण जाते. खेळपट्टी फिरकीपेक्षा वेगवान गोलंदाजांना साथ देते आहे हे ओळखून नवीन उल हक, गुलबदीन, फझलक फरुकी या त्रिकुटावर अफगाणिस्तानने लक्ष केंद्रित केले. गुलबदीनने चार, तर नवीनने तीन विकेट्स पटकावत ऑस्ट्रेलियाच्या डावाला खिंडार पाडले.

४२ वर्षीय ट्रॉट यांनी दोन वर्षापूर्वी अफगाणिस्तान संघाच्या प्रशिक्षकपदाची धुरा हाती घेतली. अफगाणिस्तान संघाची ताकद आणि कच्चे दुवे ट्रॉट यांनी समजून घेतले. त्यानुसार रणनीती आखायला सुरुवात केली. मोठ्या स्पर्धांमध्ये मोठ्या संघांचे, मोठ्या नावांचे दडपण येते. ते दडपण कसे बाजूला सारायचे हे ट्रॉट यांनी दाखवून दिले. या वर्ल्डकपमध्ये अफगाणिस्तानने न्यूझीलंड आणि आता ऑस्ट्रेलियाला हरवले आहे.

आयपीएल स्पर्धेत दोनदा पर्पल कॅपचा मान पटकावणाऱ्या ड्वेन ब्राव्होच्या नावावर टी-२० लीगमध्ये ५००हून अधिक विकेट्स आहेत. सामना सुरू असताना सीमारेषेजवळ उभे राहून ब्राव्हो गोलंदाजांशी चर्चा करताना दिसतो. काही त्रूट आढळल्यास ती लक्षात आणून देऊन सुधारणा सुचवतो. खेळाडूंइतकाच त्याचा सहभाग असतो. म्हणूनच ऑस्ट्रेलियाविरुद्ध विजय मिळवल्यानंतर ब्राव्होने खेळाडूंचे अभिनंदन करण्यासाठी मैदानात धाव घेतली.

जीवेत् शरदः शतम्!
संदेश ठोंबरे
यांना
वाढदिवसाच्या
हार्दिक
शुभेच्छा

शुभेच्छुक
तुलसीदास गायकवाड

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com